केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 55 | Marathi Daily | Monday 21/10/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: अविरत सेवेची शंभर वर्षे पान २


'यहा के हम सिकंदर' अनोखा उपक्रम शुक्रवारी पान ५


हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळ महोत्सवास प्रारंभ पान ६

### उठाठेव
- विवेक मेहेत्रे



'निवडणुकीपूर्वी सर्व स्वच्छ करू... घाण सहन करणार नाही' असं काल आपण जे म्हणालात ते शहराबद्दल की पक्षाबद्दल?.. कारण आपल्या पक्षातील काही नेते भडकलेयत त्यांना घाण म्हटल्याबद्दल!!

श्रीगोंद्यात आ. पाचपुते पत्नीऐवजी चिरंजीवांच्या उमेदवारीसाठी मुंबईत

# भाजपाच्या पहिल्या यादीत ना. विखेंसह शिंदे, राजळे अन् कर्डिले

**समाचार/नगर-दि.२१**

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आपली ९९ उमेदवारांची पहिली यादी रविवारी जाहीर केली. त्यामध्ये नगर जिल्ह्यातील भाजपाच्या पाच उमेदवारांचा समावेश आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्यासह माजी मंत्री प्रा. राम शिंदे, आमदार मोनिका राजळे आणि माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांचा त्यामध्ये समावेश आहे. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात भाजपाने विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांच्याऐवजी त्यांच्या सौभाग्यवती प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी दिली आहे. मात्र आ. पाचपुते आणि उमेदवार प्रतिभा पाचपुते यांनी श्रीगोंद्यात आपले चिरंजीव विक्रमसिंह



पाचपुते यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे करीत त्यासाठी रविवारी रात्रीच मुंबईला धाव घेतली. दरम्यान भाजपाने जाहीर केलेल्या जिल्ह्यातील पहिल्या पाच उमेदवारांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. नेवासा आणि संगमनेर विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवारांचा पहिल्या यादीत समावेश नाही. नेवासा विधानसभा मतदारसंघात भाजपाच्या उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच असून महायुतीत शिंदेसेनेनेही या जागेची मागणी केली आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले नगर दक्षिणेचे माजी खासदार डॉ. सुजय विखे यांना भाजपाच्या दुसऱ्या यादीत उमेदवारी जाहीर होते का, याविषयी मोठी उत्सुकता आहे. भाजपने काल जाहीर केलेल्या पहिल्या यादीत नगर जिल्ह्यातील शिर्डी, कर्जत-जामखेड, शेवगाव-पाथर्डी, श्रीगोंदा आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. २०१९ च्या निवडणुकीत राहुरी आणि कर्जत-जामखेड या दोन्ही मतदारसंघात भाजपाचा धक्कादायक पराभव झाला होता. असे असले तरी माजी आ. कर्डिले यांना राहुरीतून तर कर्जत-जामखेड मतदारसंघातून विधानपरिषदेचे आ. राम शिंदे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातून राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांची उमेदवारी निश्चित होती. हा मतदारसंघ ना. विखे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. कर्जत-जामखेड मतदार संघात भाजपाने विधान परिषदेचे विद्यमान आमदार प्रा. राम शिंदे यांना पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या रोहित पवार यांच्याकडून त्यांचा अनपेक्षित पण मोठा पराभव झाला होता. आता या निवडणुकीत मागील पराभवाचा वचपा काढण्यासाठी प्रा. शिंदे यांनी विधानपरिषदेच्या आमदारकीची तब्बल साडेतीन वर्ष शिल्लक असताना विधानसभेच्या रिंगणात उडी घेतली आहे. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातून भाजपाच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढविणार असून यावेळी त्या विजयाची हॅट्रिक करणार का? **(पान ३ वर)**

## श्रीगोंद्याची जागा अजितदादांना नाहीच; अनुराधा नागवडे आघाडीकडून लढणार!

दरम्यान महायुतीच्या जागावाटपात श्रीगोंदा मतदारसंघाची जागा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सुटली नाही. भाजपाने याठिकाणी प्रतिभा पाचपुते यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे नाराज झालेले श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे आणि जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनुराधा नागवडे यांनी रविवारी सायंकाळी राष्ट्रवादीला रामराम ठोकत महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्याचे संकेत दिले. लोकसभा निवडणुकीच्या काळात नागवडे दांपत्याने काँग्रेस सोडून अजितदादांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यावेळी अजितदादांनी हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे येईल आणि अनुराधा नागवडे उमेदवार असतील, असा शब्द दिला होता. मात्र महायुतीत हा मतदारसंघ भाजपाकडे गेला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून शब्द पाळला गेला नसल्याची खंत अनुराधा नागवडे यांनी व्यक्त केली. आपण ही विधानसभा निवडणूक लढविण्यावर ठाम असून महाविकास आघाडीच्या नेत्यांशी संपर्क केला आहे. चर्चा चालू आहे. आघाडीकडून उमेदवारी मिळाली तर ठीक अन्यथा आपण अपक्ष लढू, असेही नागवडे यांनी बोलून दाखविले आहे.

### निवडक

## दहशतवादी पन्नूकडून भारतीय विमान बॉम्बने उडवण्याची धमकी



**नवी दिल्ली, दि.२१-** खलिस्तानी दहशतवादी गुपतवंतसिंग पन्नूने भारतीय विमान बॉम्बने उडवण्याची धमकी दिली आहे. पन्नू म्हणाला, शीख दंगलींना ४० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त एअर इंडियाच्या विमानावर हल्ला होऊ शकतो. गुरपतवंतसिंग पन्नूने आंतरराष्ट्रीय प्रवाशांना १ ते १९ नोव्हेंबरदरम्यान एअर इंडियाच्या विमानाने प्रवास करू नका, असा सल्ला दिला आहे. गुरपतवंतसिंग पन्नूने सिख फॉर जस्टीस नावाची संघटना स्थापन केली आहे. ही संघटना सातत्याने भारतविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच पन्नू हा भारतविरोधी चिथावणीखोर भाषण देत असतो. खलिस्तानच्या नावाखाली तरुणांची माथी भडकवण्याचे काम करतो. त्यामुळे भारत सरकारने त्याला दहशतवादी घोषित केले आहे.




विधानसभा निवडणुकीसाठी उद्यापासून (दि.२२) उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. नगर शहर मतदार संघासाठी तहसील कार्यालय येथे तयारीची पाहणी करताना उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील समवेत नायब तहसीलदार अभिजित वांढेकर **(छाया- राजु खरपुडे)**

भाजपाचे शिलेदार जाहीर

# अजित पवार गट, मविआची उत्सुकता

**समाचार/नगर-दि.२१**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने पहिल्या यादीत नगर जिल्ह्याला स्थान दिले. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले, आ. राम शिंदे, आ. मोनिका राजळे आणि प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. विखे, कर्डिले, शिंदे आणि राजळे यांना अपेक्षेप्रमाणे उमेदवारी जाहीर झाली आहे. मात्र, आ. बबनराव पाचपुते यांच्याऐवजी त्यांच्या पत्नी प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रतिभा पाचपुते या जिल्हा परिषद सदस्य राहिलेल्या आहेत.

दरम्यान, भाजपाने ९९ उमेदवारांच्या नावांची घोषणा केलेल्या पहिल्या यादीत नगरच्या नेत्यांना स्थान मिळाले आहे. आता महायुतीतील अजित पवार गट, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट आणि महाविकास आघाडीतील शरद पवार गट, उध्दव ठाकरे गट आणि काँग्रेसच्या पहिल्या यादीकडे लक्ष लागले आहे. अजित पवार गटाची यादी आज सायंकाळी जाहीर होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या पाच पक्षांच्या पहिल्या यादीत नगर जिल्ह्यातील कोणत्या नेत्यांच्या नावांचा समावेश होतो, याची उत्सुकता त्यांच्या समर्थकांना आहे. जिल्ह्यात नगर शहर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत-जामखेड, राहुरी, पाथर्डी- शेवगाव, शिर्डी, श्रीरामपूर, अकोले, संगमनेर, नेवासा आणि कोपरगाव हे बारा विधानसभा मतदारसंघ आहेत. भाजपाने शिर्डीतून राधाकृष्ण विखे, राहुरीतून शिवाजी कर्डिले, कर्जत-जामखेडमधून राम शिंदे, पाथर्डी-शेवगावमधून मोनिका राजळे आणि श्रीगोंद्यातून बबनराव पाचपुते यांच्याऐवजी त्यांच्या पत्नी प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपाच्या पहिल्या यादीत नेवासा मतदारसंघाचा समावेश नव्हता. नेवासा वेटींगवर असल्याने येथील भाजपाचे माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, महाविकास आघाडीत राज्य पातळीवर अजून जागा वाटपांचा तिढा सुटलेला नाही. त्यामुळे नगर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे जागांचे गणित कसे राहिले, हे अजून समोर आलेले नाही. अजित पवारांनी शनिवारी पारनेर मतदारसंघाचा दौरा केला. त्यावेळी त्यांनी केवळ पारनेर मतदारसंघाबाबत सुतोवाच केले. अन्य मतदारसंघाचा आपल्या भाषणात उल्लेख केला नाही. त्यामुळे अजित पवार गट जिल्ह्यातील कोणत्या जागा लढविणार, याकडे लक्ष लागले आहे.

आताच्या निवडणुकीत नगरकर निश्चित बदल घडवतील

# विकासाच्या प्रतिक्षेत शहर आजही खड्ड्यातच- लोढा

**समाचार/नगर-दि.२१**

नगर शहराच्या विधानसभा निवडणुकीत माझ्यासमोर कोणाचेही आव्हान नाही. विकासकामाच्या माध्यमातून नगरकरांचा विश्वास माझ्यावर आहे, असे शहराचे विद्यमान आमदार सांगत आहेत. त्यांनी शहरात काय विकासकामे केली, ती सर्व नगरकरांना माहिती आहेत. दीडशे कोटींचा निधी आणून दहा वर्षाचा बॅकलॉग भरून काढला, असेही आमदार सांगतात. मात्र गेली दहा वर्ष नगरकर विकासाच्या प्रतीक्षेत आणि नगर शहर आजही खड्ड्यातच आहे, अशी बोचरी टीका भाजपा नेते वसंत लोढा यांनी केली आहे. यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात लोढा यांनी म्हटले आहे की, केवळ विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून एकाचवेळी सर्व



रस्त्याची कामे सुरू झाल्याने नगरकरांना व व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो आहे. ऐन सणासुदीच्या काळात वाहतुकीचा सामना करावा लागत आहे. शहराच्या आमदारांनी नगरमधील रस्ते टप्प्याटप्प्याने केले असते तर नगरकरांना वाहतुकीचा त्रास झाला नसता. बाजारपेठेतील रस्त्यांची खोदकामे झाल्याने बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांची संख्याही कमी झाली आहे. यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. नगर मनमाड रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरल्याने मोठ्या प्रमाणात श्वसनाचे आजार होत आहेत. तांत्रिकदृष्ट्या पावसाळ्यात रस्त्याची कामे करू नयेत, असे असतानाही भर पावसाळ्यात रस्त्याच्या कामे सुरू झाली आहेत. यामुळे रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीचे होणार नाहीत. शहरातील जनतेला उच्चशिक्षण, रोजगार, औद्योगिक प्रगती तसेच नगर शहर पर्यटनक्षेत्र म्हणून हवे आहे. अहिल्यानगरच्या पाठीमागून संभाजीनगर, पुणे, नाशिक या शहरांचा झपाट्याने विकास झाला. नगर शहरात बेरोजगारीच्या समस्या तसेच एमआयडीसीची दुरवस्था यामुळे शहराची बकाल अवस्था झाली आहे. नगरकरांच्या जिव्हाळ्याच्या पाण्याचा प्रश्न आजहो सुटलेला नाही. फेज टू पाण्याच्या व अमृत योजनेची काय वाट लागली, हे जनता बघते आहे. **(पान ३ वर)**

## दुचाकीवरून दारूची वाहतूक करणारा पकडला

**नगर, दि.२१-** दुचाकीवरून दारूची वाहतूक करत असलेल्या युवकाला कोतवाली पोलिसांनी पकडले. हेमंत शिवाजी सुरे (वय २३, रा. मल्हार चौक, नगर) असे पकडलेल्या युवकाचे नाव आहे. या प्रकरणी त्याच्याविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार सुरज कदम यांनी फिर्याद दिली आहे. त्याच्या ताब्यातून दारू व दुचाकी असा ४५ हजार ७६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एक युवक दुचाकीवरून देशी व विदेशी दारूची वाहतूक करत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सदर युवकाला कायनेटीक चौक ते मल्हार चौक जाणाऱ्या रस्त्यावर पकडले.

संस्कारप्रेमी
आदर्श व्यक्तिमत्व



अशोकभाऊ फिरोदिया
जन्म दि. २ ऑक्टोंबर १९४४ । स्व. दि. २२ ऑक्टोंबर २०००
२४ व्या पुण्यस्मरणदिनी
भावपूर्ण श्रद्धांजली !
फिरोदिया परिवार
नमोह । कल्पतरु । सोहम । अनुरोन
उद्योग समुह
अहमदनगर

मतदार जागृतीसाठी विशेष उपक्रम

# प्रशासनाचे विधानसभेसाठी मिशन ७५ टक्के

**समाचार/नगर-दि.२१**

विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतदारसंघात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मिशन ७५ टक्के अंतर्गत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

मतदार जागृती उपक्रमासाठी विशेष आराखडा तयार केला आहे. त्यानुसार विविध वयोगटातील आणि क्षेत्रातील नागरिकांना या उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याने अभिनव उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. या पूर्वीदेखील जिल्ह्याच्या स्वीप उपक्रमांचे विविध पातळीवर कौतुक करण्यात आले आहे. स्वीप उपक्रमात जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, क्रीडा संघटना, पुरस्कारप्राप्त खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, ग्रंथालये यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. २२ ऑक्टोबर रोजी डेमोक्रसी ऑन व्हिल उपक्रमाद्वारे या कार्यक्रमाचा शुभारंभ होईल. याअंतर्गत सायकल फेरीचे आयोजन करण्यात येऊन मतदानाची शपथ घेण्यात येणार आहे. माय एपीक, माय बाईक उपक्रमाच्या माध्यमातून २३ ऑक्टोबर रोजी मतदार



ओळखपत्राचे महत्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. २४ ऑक्टोबरला नागरिकांच्या सहभागातून लोकशाही दौडचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ऑक्टोबर रोजी आयोजित होणाऱ्या जनजागृती प्रभातफेरीत खेळाडू, सामाजिक संस्था, ग्रंथालयांचे सदस्य सहभागी होतील. २६ ऑक्टोबर रोजी मान्यवरांचे संदेश समाज माध्यमांद्वारे देण्यात येणार आहेत.

सर्वसमावेशक मतदान या संकल्पनेनुसार उपक्रमात समाजातील विविध घटकांचा सहभाग घेण्यात येणार आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी निवडणुकीत मतदान करणे आवश्यक असून नागरिकांनी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजवावा आणि इतरांनाही मतदान करण्यास प्रेरित करण्यासाठी मतदान जागृती उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

संपादकीय

# अविरत सेवेची शंभर वर्षे

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रभक्ती, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार आणि नि:स्वार्थ समाजसेवा याच ध्येयाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष सुरु झाले आहे. गेल्या शंभर वर्षांच्या काळात या संघटनेने आपला मूळ ध्येयवाद, उद्देश आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत कार्याचा चौफेर विस्तार केला, पण पूर्ण स्वावलंबी, शक्तिशाली, आत्मनिर्भर राष्ट्रनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या कोट्यवधी समर्पित स्वयंसेवकांची फळीही निर्माण केली. संपूर्ण देशात राष्ट्राभिमानाच्या जागृतीबरोबरच भारताला मातृभूमी मानणारे सर्व हिंदू हे भारतीय अशी हिंदुत्वाची व्यापक भूमिका घेत वर्ण, जातीभेदविरहीत एकजूट करत हिंदू समाजनिर्मितीसाठी विचारप्रबोधनही केले. सांस्कृतिक संघटनेने आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सुरू केलेल्या संघ परिवारातल्या भारतीय किसान संघ, सेवाभारती, संस्कृतभारती, स्वदेशी जागरण मंच, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्रसेविका समिती, संस्कार भारती अशा विविध संस्थांद्वारे संस्कृती संवर्धनाबरोबरच गेली हजारो वर्षे उपेक्षित आणि वंचित राहिलेल्या कोट्यवधी आदिवासींना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठीही समर्पितपणे कार्य केले. कोणत्याही मोहमयी पदाची अपेक्षा न ठेवता संघाच्या राष्ट्रीय विचारसरणीनुसार एक कोटीच्या आसपास स्वयंसेवक कार्य करतात. अशाच प्रकारे कार्य करणाऱ्या कोणत्याही संघटनांपेक्षा हे नक्कीच उजवे असे चित्र आहे. संघटनेचे सुमारे पन्नास हजार प्रचारक येथे राष्ट्रसेवेला आपले जीवन अर्पण करत असतात. त्यांना ना पैशाची अपेक्षा असते ना घरदाराची. हे कार्यकर्ते अगदी मणिपूर, मेघालय, आसामसारख्या दूरस्थ असलेल्या प्रदेशात जोखमीचे काम करत असतात. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर लावलेल्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे, पण साऱ्या जगभरात या वटवृक्षाच्या फांद्या आणि पारंब्यांचा विस्तारही झाला आहे. काळानुसार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संघ परिवाराशी संलग्न विविध संस्थांची स्थापना केली आणि या संस्थांनीही समाजसेवेचा नवा मानदंड निर्माण केला. भूकंप, महापूर यासह विविध नैसर्गिक आपत्तीच्या संकटातही संघाचे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते धावून जातात आणि आपत्तीग्रस्तांना निःस्वार्थपणे सहाय्य करतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही फॅसिस्ट, कडवे हिंदुत्वनिष्ठ आणि प्रतिगामी विचारांची, मनुवादाचे म्हणजेच जातीय वर्णवादाचे समर्थन करणारी संघटना असल्याची टीका या वाटचालीमध्ये सातत्याने होत असली तरी प्रत्यक्षात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवाराच्या संस्थांनी जातीभेदविरहीत एकजुटीनेच समाजसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. चारित्र्य, शीलसंवर्धनाचे प्रशिक्षण देत भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्यांचा आदर्श जपत संघाने सामाजिक कार्याचा विस्तार करतानाच धर्मांध मुस्लीम आणि धर्मवेड्या ख्रिश्चन शक्तींना कडाडून विरोध केला आहे. भारतात आदर्श आणि चारित्र्यशील पिढ्या घडाव्यात, यासाठीच गेली शंभर वर्षे संघाचे हे सामाजिक आणि राष्ट्रसेवेचे कार्य अखंड सुरू आहे. प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राजकारणात सक्रिय सहभाग घ्यायचा नाही, हे धोरण स्वीकारले आणि ते अंमलातही आणले. पण, स्वातंत्र्य मिळाल्यावर संसदीय लोकशाहीत तेव्हाच्या प्रबळ काँग्रेस पक्षाला प्रबळ ठरणारा राजकीय पर्याय असावा, ही विचारसरणी माजी सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांनी स्वीकारली आणि प्रखर राष्ट्रवादी, हिंदुत्ववादी आणि बलशाली राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या राजकीय पक्षाच्या स्थापनेला मान्यता दिली आणि या नव्या पक्षाच्या व्यापक संघटनकार्यासाठी संघाचे समर्पित कार्यकर्तेही नव्या पक्षाला दिले. डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी स्थापन केलेल्या संघविचाराच्या आणि व्यापक राष्ट्रीय विचाराने राष्ट्रीय पक्षाची बांधणी करणाऱ्या 'भारतीय जनसंघ' या राष्ट्रवादी पक्षाच्या संस्थापकांमध्ये दीनदयाळ उपाध्याय, बलराज मधोक आणि नानाजी देशमुख या कुशल संघटकांचा आणि अटलबिहारी वाजपेयी या प्रखर राष्ट्रवादी विचारांच्या नेत्याचाही सहभाग झाला. २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी भारतीय जनसंघाची स्थापना झाली आणि बलशाली भारताच्या निर्मितीसाठी हिंदूराष्ट्रवाद, हिंदुत्व, अखंड मानवतावाद, आर्थिक राष्ट्रवाद, राष्ट्रीय सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि संवर्धन या ध्येयवादाने काँग्रेसला राष्ट्रवादी राजकीय पक्षाचा पर्याय दिला गेला. १९५३ मध्ये पक्षाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा काश्मीरमध्ये संशयास्पद मृत्यू झाला आणि जनसंघावर संघाच्या नेत्यांचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले. साम्यवादाला आणि धर्मांध मुस्लीम शक्तीला कडाडून विरोध करणारे जनसंघाचे नेते आणि कार्यकर्ते यांना आपल्याला देशाच्या राजकारणात अखंड संघर्ष करावा लागणार याची पूर्ण खात्री होती. प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी काँग्रेसच्या विचारांशी झुंजही दिली. समान नागरी कायदा लागू व्हावा आणि काश्मीरमध्ये लावण्यात आलेले राज्यघटनेचे ३७० वे कलम रद्द केले जावे, अशी मागणी पक्षाने १९६७ मध्ये केली. जनसंघाचे माजी अध्यक्ष दीनदयाळ उपाध्याय यांच्या कारकिर्दीत पक्षाने एकात्म मानवतावादी विचारधारेचा स्वीकार केला. समाजवादी नेते राममनोहर लोहिया हेही उपाध्याय यांच्या विचारांशी सहमत होते. काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी संपवण्यासाठी १९६७ मध्ये विरोधी पक्षाच्या संयुक्त विधायक दल या नव्या आघाडीमध्ये जनसंघ सामीलही झाला. या प्रयोगाला काही राज्यांमध्ये यश मिळाले, पण हा प्रयोग भिन्न विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या संघर्षात यशस्वी ठरला नाही. स्वदेशी, गोहत्याबंदी, यासह आक्रमक हिंदुत्वाचा प्रचार करणाऱ्या जनसंघाची वाटचाल 'एकला चलो रे' धाटणीची होती. उपाध्याय यांच्या खुनानंतर बलराज मधोक, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी हे नेतेही अध्यक्ष झाले. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात यासह मोजक्याच राज्यात जनसंघाची पाळेमुळे रुजली. १९६७ मधल्या निवडणुकीत जनसंघाने लोकसभेच्या ३५ जागा जिंकल्या.

## देडगांवकर यांची तत्परता; वगारला मिळाले जीवदान

**समाचार/नगर-दि.२१**

छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावरील अहिल्यानगर येथील डीएसपी चौकात शनिवारी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पुढील नाल्यामध्ये संध्याकाळी ७ वा. नालीमध्ये एक म्हशीचे वगार पडले होते. देडगावकरांनी तातडीने अहिल्यानगर महानगरपालिकाच्या अग्निशाम विभागाला दूरध्वनीवरुन म्हशीच्या वगारची माहिती दिली. तातडीने महानगरपालिकेची अग्निशामकची गाडी डीएसपी चौकात आली. महानगरपालिकाच्या अग्निशामक विभागाच्या कर्मचाऱ्याने नाल्यातील पडलेले म्हशीच्या वगारला सुखरुप नाल्याच्यावर काढले.



समाजसेवक अविनाश देडगांवकर यांच्यामुळे म्हशीच्या वगाराला जीवदान मिळाले. यावेळी वाहतूक पोलिस संजय घोरपडे व महानगरपालिका अग्निशामक विभागाचे कर्मचारी चिंधू भांगरे, ज्ञानेश्वर चाकणे, शिवाजी गायकवाड, संदीप शिरसाठ, नाना सोलट, सिकंदर वाकुरे, दीपक डाके आदी उपस्थित होते.

## प्रसाद शिंदे यांना समाजभूषण पुरस्कार

**समाचार/नगर-दि.२१**


शैक्षणिक क्षेत्रात , सामाजिक क्षेत्रात, आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी अविरत कार्य करणारे, सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांना राया क्रांतिकारकफाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.



फाउंडेशनचे संस्थापक कृष्णा गोहिरे ,आयोजक नामदेव जाधव यांनी सांगितले की , सामाजिक कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध विभागांतील व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो अहिल्यानगर येथील प्रसाद शिंदे यांना फाऊंडेशन माध्यमातून देण्यात येणार राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देताना विशेष आनंद होत आहे. शिंदे शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी अविरत कार्य करीत आहेत. शिक्षकांना न्याय मिळावा म्हणून त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. रायझिंग ट्रायबल फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून शिंदे विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात.

## मौन

एकदा एक गुरुवर्य त्यांच्या खास शिष्यांसोबत भ्रमण करीत असताना न्याहरीसाठी एका जंगलात थांबले. अन्नग्रहण झाल्यावर आणि वामकुक्षी संपल्यावर त्यांना खूप तहान लागली. जवळच वाहणाऱ्या नदीवर पाणी आणण्यासाठी शिष्य पोहोचला. तितक्यात एक बैलगाडी पाण्यातून गेल्यामुळे आणि वादळी हवेमुळे नदीपात्रातील स्वच्छ दिसणारे पाणी ढवळून निघाले आणि गढूळ झाले. आता असे अस्वच्छ जल कसे काय न्यावे. या विचाराने शिष्य तेथेच थांबला. थोड्यावेळाने पाण्याची हालचाल संथ झाली आणि गाळ तळाला बसल्यामुळे वरचे स्वच्छ पाणी दिसू लागले. आता ते पाणी घेऊन शिष्य गुरुंकडे पोहोचला आणि त्याने प्रामाणिकपणे उशीर का झाला याचे कारण सांगितले. ही संधी साधत गुरुंनी आपल्या शिष्याला खूप मोठी शिकवण दिली ज्याची कृती त्याने नुकतीच केली होती.




गुरुजी म्हणाले, या पाण्याच्या गढूळपणासारखे प्रसंग रोजच आपल्या आयुष्यात येत राहतात. आपल्या नकळत सरळमार्गी चालणाऱ्या आपल्या आयुष्यात बऱ्याच लोकांकडून असे काही खडे टाकले जातात की संथपणे व शांतपणे वाटचाल करणारी नितळ पाण्यासारखी शुध्द अशी आपली जीवनाची लय किंवा घडी अचानक बिघडते, विस्कटते. क्षणामध्ये निराशा, नकारात्मकता, त्रास, ताणतणाव, उद्वेग किंवा चिडचिड अशा वर्तनाचा आपलाच आपल्याला त्रास सुरू होतो. आजच्या जमान्यात सर्वांचीच नियंत्रण क्षमता खूपच क्षीण झालेली आहे. त्यामुळे मन-मेंदूवर ताबा उरत नाही. म्हणून त्या परिस्थितीला धीराने तोंड देण्याऐवजी पटकन रिॲक्शन दिली जाते आणि मग वातावरण अजून जास्तच गढूळ बनते. गुरुजी पुढे शिकवितात की शहाणी आणि समंजस व्यक्ती मात्र थोडसं धीराने घेते. प्रसंगानुरुप शांत राहते. काही काळ जाऊ देते कारण तिला माहीत आहे की जोपर्यंत अस्वच्छ, गढूळपणा आहे तोपर्यंत सर्वच षड्रिपू डोके वर काढून परिस्थिती चिघळण्यास हातभार लावतात. पण जेव्हा आपण मौनासारखे अस्त्र घेऊन सज्ज होतो तेव्हा मात्र त्याच्यापुढे सर्व त्रासदायक बाजू लंगडी पडते आणि पॉवरफुल असा मौन मंत्र तत्काळ लागू पडायला लागतो. जसजशी परिस्थिती निवळू लागते, तसतशा गोष्टी नीटपणे उमगू लागतात. चुका कळून चुकतात, पश्चाताप दिसू लागतो. मग तीच परिस्थिती वेगळे वळण घेते. निराशा, षड्रिपू तळाला पोहोचतात आणि सात्विक भावना वर तरंगू लागते.

म्हणजेच तुम्ही जो शांत वेळ काहीही न करता काढलात तीच तुमची महत्वाची ताकद बनते. मग योग्य निर्णय क्षमता जी आधीच विकसित असते ती आपले काम चोख बजावू शकते. आपण मन शांतपणे तळापर्यंत पाहू शकतो आणि आपल्या आयुष्याच्या ध्येयापासून विचलित होत नाही. जीवनात शब्दांना खूप महत्व आहे. त्यांना जितके कमीत कमी वापराल, जितकं कमी आणि योग्य बोलाल तितकी तुमची किंमत वाढेल आणि लोक खूप आदराने प्रत्येक शब्द झेलतील. योग्यवेळी गप्प राहणारा, हवे तेथे नेमके बोलणारा आणि शब्द बाहेर जाण्याआधी दहावेळा विचार करणारा नेहमीच ज्ञानी म्हणून गणला जातो.

मौन राहिल्याने जगाशी संपर्क कमी होतो पण आपण विचार आणि आत्म्याशी जोडले जातो. मौन तुम्हाला दुसऱ्यांना समजण्यासाठी खूप मदत करते, निरीक्षण क्षमता वाढते. शांत राहण्याने आपल्या आतील वेगवेगळ्या प्राणशक्ती पॉवरफुल बनतात. मन नियंत्रणात येते आणि आंतरशक्ती विकसित होते. कधी कधी एक शांत आणि सुंदर स्मित ही दुसऱ्यासाठी एक आश्वासक आणि सुरक्षित अशी भेट असू शकते. त्यासाठी कोणत्याच शब्दांची गरज नसते. अशा मौनाला आज खूप किंमत आहे. काही गोष्टी गुपीत फक्त आपल्यापुरत्या असतात. खूप बोलक्या स्वभावामुळे आतील भावना, विचार सतत प्रकट होतात आणि नको ते नको त्या व्यक्तीला पोहोचवल्याचे दुःख पचवावे लागते.

आपल्या प्रत्येक कृतीसाठी समोरच्याला कारण द्यायची गरज नसावी. जर तुम्ही योग्य व बरोबर असाल तर दुसऱ्यांना समजविण्यात आपली शक्ती वाया घालू नका. जे तुम्हाला खरंच मनापासून समजतात व आदर करतात, त्यांना अतिरिक्त शब्दांची गरज नाही आणि ज्यांना तुम्ही कधी समजावूच शकणार नाही, तेथे तुमचा प्रत्येक शब्द फोल ठरेल. मग असे हे किंमती शब्द जपून ठेवा. योग्य प्रसंगी वापरा अन्यथा गप्प रहा. मौन पाळा. आनंदी आणि निरोगी असा. जीवनात काही उच्च ध्येय गाठायची असतील तर महत्प्रयासाने शांत, गप्प आणि एकाग्र व्हायचा प्रयत्न करा, ध्यान करा आणि मग्न व्हा!

**- डॉ. शामा मंत्री**
समुपदेशक
मो. न. ९८९०९९५४११




### राशीभविष्य

- **मेष** : किरकोळ बाबींचा विचार करू नका. भावनेपेक्षा कर्तव्याकडे अधिक लक्ष द्या. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ** : इतरांच्या अपेक्षा वाढीस लागतील. मनस्तापाचे प्रसंग संभवतात. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मिथुन** : अचानक धनलाभ संभवतो. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत चिंता राहील. स्थावर प्रश्न आणखी बिकट बनेल. अनुभवींचा सल्ला अवश्य घ्यावा.
- **सिंह** : नव्या कामांबाबत उत्साह राहील. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **कन्या** : पूर्वीच्या ओळखी कामी येतील. कर्ज प्रकरणाबाबत दिलासा मिळेल. विद्यार्थ्यांना सयश लाभेल.
- **तूळ** : नव्या करारांना अनुकूलता राहील. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **वृश्चिक** : व्यवसायात उत्तम स्थिती राहील. नव्या कामांना चालना मिळेल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल.
- **धनु** : व्यवसायात मतभेद संभवतात. प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **मकर** : उत्साह वाढवणाऱ्या घटना घडतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **कुंभ** : स्वमताग्रह टाळायला हवा. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. दिवाळीनिमित्त खरेदीचा उत्साह राहील.
- **मीन** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. मनाजोग्या घटना घडतील. स्थावर प्रश्नात तडजोड हिताची ठरेल.

### २२ ऑक्टोबर — दिनविशेष

- **१९६३** : पंतप्रधान पं.नेहरुंच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण.
- **१९७८** : प्रख्यात लेखक प्रा. ना. सी. फडके यांचं निधन.
- **१९९८** : खलनायक म्हणून प्रसिद्धी मिळवलेले अजित खान उर्फ अजित यांचं निधन.
- **२००८** : भारताच्या 'चांद्रयान १' उपग्रहाचं प्रक्षेपण.
- **२०१३** : पुण्याच्या अमोल बराटेने मॅटवरीलकुस्तीमध्ये 'हिंदकेसरी' किताब पटकावला.

महत्त्वपूर्ण काही...

### तेल उत्पादनाचा श्रीगणेशा

आजमितीस अवघं जग चालवण्याची ताकद कोणामध्ये आहे, असा प्रश्न केला तर कोणा एका व्यक्तीचं नाव न घेता इंधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या तेलामध्ये आहे, हे उत्तर अधिक समर्पक ठरेल यात शंका नाही. त्यामुळेच तेलाचा मुबलक साठा असणारे देश आज जागतिक पातळीवर महत्त्वपूर्ण स्थान राखून असलेले दिसतात. खनिज तेल ही देशाची मौल्यवान संपत्ती समजण्याचा आजचा काळ आहे. खडकात आढळणाऱ्या नैसर्गिक तेलाला खनिज तेल म्हणतात. हे तेल म्हणजे मुख्यत: विविध लांबींच्या हायड्रोकार्बनच्या साखळ्यांचं मिश्रण असतं. उर्ध्वपातनाद्वारे अशा तेलाचं शुद्धीकरण करून त्यापासून पेट्रोल, डिझेल, रॉकेल आदी पदार्थ मिळवतात. जमिनीतून झिरपणाऱ्या खनिज तेलाची ओळख चार हजार वर्षांपूर्वीच झाली आहे. परंतु आधुनिक तेलउद्योगाचा पाया घालणाऱ्या पहिल्या विहिरी कॅनडा आणि अमेरिकेत १८५८-५९ मध्ये खोदल्या गेल्या. १८९६ मध्ये अमेरिकेतील सांता बार्बरा खाडीत खोदल्या गेलेल्या विहिरीद्वारे तेलाच्या सागरी उत्पादनालाही सुरुवात झाली.

आरोग्यमंत्र

### विषाणूजन्य ताप आहे?

वरकरणी ताप हा सर्वसामान्य आजार गणला जातो. खेरीज ताप हा आजार नसून आजाराचं लक्षण आहे असं तज्ज्ञ सांगतात. मात्र तापाचेही वेगवेगळे प्रकार आहेत. ते समजून घेणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ विषाणूजन्य तापाला व्हायरल फिवर म्हटलं जातं. योग्य औषधोपचारांनी हा ताप वेळीच नियंत्रणात आणता येत असला तरी उपचारास विलंब लागला तर आरोग्यास धोका उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विषाणूजन्य ताप विशिष्ट प्रकारच्या विषाणूंमुळे होत नाही तर हवेतल्या विविध प्रकारच्या विषाणूंमुळे होणाऱ्या जंतूसंसर्गाची परिणती तापात होते. म्हणून या तापाला विषाणूजन्य ताप म्हटलं जातं. या तापाची लक्षणं सर्वसामान्य तापाप्रमाणेच असल्याने त्यावर एकाच प्रकारची औषधं दिली जातात. विषाणूजन्य अन्नपदार्थ किंवा पेयांचं सेवन, विषाणूजन्य तापाच्या रूग्णाशी किंवा त्याच्या रक्ताशी आलेला संपर्क तसंच श्वसनावाटे शरीरात गेलेली दूषित हवा यामुळे विषाणूजन्य तापाची लागण होऊ शकते. विषाणूजन्य ताप संसर्गजन्य आजार मानला जातो. विशेषत: पावसाळ्यात विषाणूजन्य तापाचा प्रादुर्भाव होतो. मात्र बरेचदा या तापाचं वेळेत निदान होत नाही. अनेक संसर्गजन्य आजारांची सुरूवात तापानेच होत असल्याने याचं निदान करणं जिकिरीचं होतं. अशा वेळी विषाणूजन्य तापाच्या प्रमुख लक्षणांकडे लक्ष द्यायला हवं. विषाणूंचा संसर्ग झाल्याने उद्भवणारा ताप तीव्र स्वरूपाचा असतो हे लक्षात घ्यायला हवं.



मनातलं ओठांवर

### प्रत्यक्ष संपर्क गरजेचा

कॉलेज संपून बरीच वर्षं झाली होती. दरम्यानच्या काळात त्या पाच मैत्रिणी एकमेकींच्या संपर्कात नव्हत्या. एक शहराच्या या कोपऱ्यात तर दुसरी दुसऱ्या कोपऱ्यात अशी स्थिती असताना प्रत्यक्ष भेटणं सोडाच पण फोनवरील संपर्कही तुटला होता. पण रमाने सगळ्यांचे संपर्क क्रमांक मिळवले आणि व्हॉट्स ॲप ग्रूप तयार केला. त्यानंतर जमेल तशा पाच जणींच्या गप्पा रंगू लागल्या. या आभासी विश्वात त्यांनी आपलं हरवलेलं विश्व शोधण्यास सुरूवात केली. पण या सगळ्यात कोमलच्या कॉमेंट्स त्यांना खटकत होत्या. पाच वर्षांपूर्वी लग्न झालेली कोमल वैवाहिक आयुष्याबद्दल फारशी समाधानी दिसत नव्हती. इतकंच नव्हे तर तिच्या प्रतिक्रिया नैराश्यग्रस्त अवस्था दाखवून देत होत्या. आता मात्र चारही जणींनी प्रत्यक्ष भेटायचं ठरवलं. कारण या माध्यमातून समस्या समजली असली तरी तिचं निराकरण मायेच्या स्पर्शाने आणि आधार देणाऱ्या शब्दानेच होणार होतं. त्यासाठी अंतर संपवणं गरजेचं होतं.

### पंचांग

**मंगळवार, २२ ऑक्टोबर २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
अश्विन कृ. ६, नक्षत्र : आर्द्रा
चंद्रराशी : मिथुन, परिघ योग
सूर्योदय : ६.३७, सूर्यास्त : ०६.०९

### फॉरवर्ड्स

**प्रेमात काही मिळण्याची अपेक्षा करणं तसं व्यर्थच असतं. कवी म्हणतो...**

बेपनाह मोहब्बत की सजा पाए बैठे हैं
हासिल कुछ ना हुआ, सबकुछ लुटाये बैठे हैं

### वाचा तर खरं

नागरिकत्वाबाबत प्रत्येक देशाचे वेगवेगळे नियम असतात. उदाहरणार्थ अँटीगुआ आणि बारबुडा या देशाचे नागरिक होण्यासाठी त्या देशाच्या राष्ट्रीय विकास फंडात एक कोटी ३० लाख, तेथील रियल इस्टेटमध्ये २.७ कोटी रुपये किंवा व्यवसायात १०.३ कोटी रुपयांची गुंतवणूक करणं आवश्यक असतं. कॅरेबियन समुद्रातील या अत्यंत छोट्या बेटांच्या स्वरुपातील देशांचे नागरिक होण्यासाठी या अटी पाळल्या की काम फत्ते होतं आणि तुम्हाला त्या देशाचं नागरिकत्व मिळतं.

करिअरवाटा

### राखा बॉसची मर्जी

ऑफिसमध्ये बॉस हा सर्वेसर्वा असतो. तो सांगेल ती पूर्व, अशीच काहीशी परिस्थिती असते. म्हणून त्याची मर्जी राखणं आणि त्याच्याकडून एखादी गोष्ट पदरात पाडून घेणं हे कौशल्याचं काम ठरतं. याविषयी...



✻ बॉसचा मूड बघून विषय काढा. डोक्यात राग असताना, कामाचा ताण असताना, एखाद्याशी वादविवाद झालेला असताना मूड चांगला नसतो. तुम्ही नेमक्या याच वेळी विषय काढला तर वड्याचं तेल वांग्यावर निघू शकतं. ✻ बॉस सुट्टीवरुन परत आल्यावर, दौऱ्यावर जाण्याआधी वादग्रस्त विषय टाळा. बॉसचं शेड्युल व्यस्त असेल तेव्हा बोलू नका. ✻ बॉसशी उच्च स्वरात बोलू नका. तुम्ही रागावलेला पाहून बॉसचा रागही वाढू शकतो. ✻ कुठल्याही विषयावर मुद्देसुद बोला. चाचरत, अस्पष्ट आणि अधांतरी बोलणं टाळा. मुद्दे खंबीरपणे मांडा. ✻ तुम्ही महत्त्वाच्या पदावर असाल तर अधिक योग्य पद्धतीनं अडचण हाताळली जाईल. तुमच्या कामातील कौशल्य, प्रामाणिकपणा, वागण्या-बोलण्यातील पद्धत, कामाची निकड या सर्व बाबींवर तुमच्या अडचणीचं महत्त्व अवलंबून आहे. ✻ बॉस तुमच्या मताला किंमत देत नसेल तर त्यांच्या मर्जीतील व्यक्तीची मदत घ्या.

खेचाखेची

### प्रतिक्रिया

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमती सर्वसामान्यांचं बजेट कोलमडवून टाकण्यास पुरेशा असतात. सतत कमी-जास्त होत असल्यामुळे या किमतींची चर्चाही असते. मात्र हीच बाब विनोदनिर्मितीस कारक ठरते. कशी ते पहा...

**पत्रकार:** सध्या पेट्रोलचे दर प्रचंड वाढले आहेत. यावर तुमची प्रतिक्रिया काय आहे?

**गंपूनाना:** कितीपण वाढू दे. आपण तीसचंच टाकतो. उताराला लागलो की गाडी बंद करतो.

### वेगळे काही

ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी झोपेबाबत माणूस आणि कुत्र्यामध्ये बऱ्यापैकी साम्य असतं असं दाखवून दिलं आहे. माणसाप्रमाणेच कुत्रादेखील हलक्याशा चाहुलीनं जागा होतो. माणूस सात-आठ तास झोपत असेल तर कुत्रा बारा ते चौदा तास झोपतो. पण जाग येता क्षणी तो सजग असतो. माणसाप्रमाणेच कुत्र्यालादेखील स्वप्नं पडतात. झोपेच्या मध्यम अवस्थेत ही स्वप्नं पडतात. झोपेची ही अवस्था काही काळापर्यंतच टिकते. गाढ झोपेत असताना माणसाप्रमाणेच त्याच्याही शरीराची अजिबात हालचाल होत नाही. संशोधकांच्या मते जेनेटिक आणि शारीरिक रुपामध्ये माणूस आणि कुत्रा यांच्यात ९५ टक्के साम्य आहे.

हेअर केअर

### केस दिसतील तजेलदार

ऋतूबदलाच्या या काळात केसांच्या अनेक तक्रारी डोकं वर काढतात. केस निस्तेज, कोरडे होतात. मात्र काही घरगुती उपायांद्वारे ही समस्या सोडवता येते.



✻ ॲव्हाकॅडोचा गर घ्या. त्यात एक अंडं घाला. हे मिश्रण ओल्या केसांना लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. ✻ शँपूमध्ये एक अंडं घालून केसांना लावा. पाच मिनिटांनी धुवून टाका. केस छान मऊ होतील. ✻ कोरड्या केसांसाठी खोबरेल तेल वापरू शकता. ✻ अर्धा कप पाण्यात एक मोठा चमचा ॲपल सिडर व्हिनेगर घाला. हे पाणी केसांवर लावा. थोड्या वेळाने धुवून टाका. ✻ दह्याने केसांना मसाज करा. २० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. नंतर शँपू लावा. या उपायांमुळे केसांचं आरोग्य सुधारेल. सध्या केस रंगवण्याचा ट्रेंड भरात आहे. आवडत असल्यास तुम्हीही केस रंगवू शकता. दोन शेड्सवाला ओंब्रे कलर केस हायलाईट करण्यासाठी वापरता येईल. सोंब्रे कलरही छान दिसतो. एथनिक्स घालायचे असतील तर तुम्ही सोंब्रे रंगाने केस रंगवू शकता. सौम्य स्वरूपाचा रंग हवा असेल तर सुपर सोंब्रेचा पर्याय आहे. हा रंगही केसांचा लूक खुलवतो.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ पान ३


### प्रभावती घोगरे यांची विखेंवर टीका

# नगर दक्षिणेतून जनतेने तुम्हाला का हाकलले ?

**समाचार/संगमनेर-दि.२१**

निवडणुका जवळ आल्या म्हणून अनेक रस्त्यांवर लगेच मुरूम टाकले आहेत. पूर्वीही सत्ता तुमचीच होती मग यापूर्वी का कामे झाली नाहीत. राहाता तालुका का भकास केला असे सांगताना तुम्ही जर विकास केला असता तर तुम्हाला दक्षिणेतून लोकांनी हाकलले नसते अशी टीका प्रभावती घोगरे यांनी विखे यांच्यावर नाव न घेता केली.



डॉ.जयश्री थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या युवा संवाद यात्रेत राहाता मतदार संघातील रहिमपूर, आश्वी,ओझर,मनोली,कनकापूर यांसह २८ गावांमध्ये झालेल्या विविध गावांमधून त्या बोलत होत्या. यावेळी सुरेश थोरात, निळवंडे पाट पाणी कृती समितीचे उत्तमराव घोरपडे उपस्थित होते.

घोगरे म्हणाल्या, ज्या काँग्रेसने त्यांना आतापर्यंत सर्व पदे दिली, इतके मोठे केले. त्या काँग्रेसच्या विरोधात ही मंडळी आता बोलत आहे. अजून किती पक्ष बदलतील हे कोणाला माहित नाही. दहशतवाद आणि दडपशाही विरुद्ध मी सर्वसामान्य शेतकरी महिला उभी राहिली आहे.

त्यांनी राहाता तालुका भकास केला. कोणताही विकास केला नाही. निवडणुका जवळ आल्या की रस्त्यावर मुरूम टाक. फक्त कार्यकर्त्यांनाच मुरूम टाकायची परवानगी आहे. त्यांच्या गोठ्यांपर्यंत मुरूम आहे. मात्र सर्वसामान्यांना रस्त्यावर टाकायला मुरूम मिळत नाही. शासनाच्या सर्व योजनांचे फ्लेक्स ही स्वतःचे फोटो टाकून लावतात. फ्लेक्सची फॅक्टरी त्यांनी काढली आहे. लाडक्या बहिणी योजनेचे पैसे हे त्यांचे नाहीतर सर्वसामान्यांचे आहे. या संवाद यात्रेत युवक महिला व नागरिकांची मोठी उपस्थिती ही लक्ष वेधून घेत होती.

---

### पान १ वरुन

## यादीत ना. विखेंसह शिंदे, राजळे अन् कर्डिले

याची उत्सुकता आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघात जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या प्राजक्त तनपुरे यांच्याकडून पराभूत झाले होते. आताच्या निवडणुकीतही राहुरी मतदारसंघात आमदार प्राजक्त तनपुरे विरुद्ध माजी आ. कर्डिले असा सामना रंगणार आहे. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात भाजपची उमेदवारी विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांनाच पुन्हा जाहीर होते की त्यांचे चिरंजीव विक्रमसिंह पाचपुते भाजपाचे तिकिटावर निवडणूक लढविणार, याची मतदारसंघात मोठी उत्सुकता होती. तब्येतीच्या कारणास्तव आ. पाचपुते यावेळी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नाहीत असेही सांगितले जात होते. भाजपाने या निवडणुकीसाठी आ. पाचपुते यांच्याऐवजी त्यांच्या सौभाग्यवती प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पाचपुते यांच्या घरातच उमेदवारी असल्याने त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला. मात्र त्यानंतर प्रतिभा पाचपुते यांनी श्रीगोंदा मतदारसंघात आपल्याऐवजी चिरंजीव विक्रमसिंह पाचपुते यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली. त्याचसाठी आ. पाचपुते आणि प्रतिभा पाचपुते रविवारी रात्रीच मुंबईकडे रवाना झाले. दरम्यान भाजपाने श्रीगोंदा मतदारसंघात प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी दिल्याने ही निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या भाजपाच्या अन्य इच्छुकांचा मात्र हिरमोड झाला आहे. नेवासा आणि संगमनेर या दोन विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवारांची नावे पहिल्या यादीत नाहीत. नेवासा मतदारसंघातून माजी आ. बाळासाहेब मुरकुटे आणि जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विठ्ठलराव लंघे यांनी उमेदवारीसाठी फिल्डिंग लावली आहे. या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही तयारी चालवली असून महायुतीच्या जागावाटपात नेवासा मतदारसंघाची जागा शिवसेनेला मिळावी यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे महायुतीत हा मतदारसंघ भाजपाकडेच राहणार की शिवसेनाकडे जाणार याबाबत चर्चा आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघात नगर दक्षिणेचे माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी चालवली आहे. या मतदारसंघात काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार बाळासाहेब थोरात यांचे प्राबल्य आहे. चार महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या विरोधात आ. थोरात यांनी नगर दक्षिणेत विशेष लक्ष घातले होते. त्यावर आता माजी खा. विखे यांनी संगमनेर मतदारसंघात आ. थोरात यांनाच आव्हान देण्याची तयारी चालू केली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. विखे यांनी संगमनेर विधानसभा मतदारसंघात डॉ. सुजय विखे हेच भाजपाचे उमेदवार असू शकतात, असे स्पष्ट संकेत दिले आहेत. भाजपाच्या दुसऱ्या यादीत नेवासा आणि संगमनेर विधानसभा मतदारसंघासह अन्य कोणत्या मतदारसंघात भाजपा उमेदवार देणार, याची कार्यकर्त्यांना उत्सुकता आहे.

## विकासाच्या प्रतिक्षेत शहर आजही खड्ड्यातच- लोढा

अतिक्रमणात शहर पूर्णपणे बुडाले आहे. भाजी मार्केटने शहरातील व उपनगरात रस्ते व्यापले आहे. असे असताना फक्त जाहिराती करून नगरकरांची दिशाभूल चालू आहे. शहरात झालेल्या विकास कामांच्या दर्जाचा विचार करता वर्ष सहा महिन्यात त्या रस्त्याची वाट लागेलं आणि शहर पुन्हा खड्डेमय होईल, अशी परिस्थिती आहे. शहरातील नाट्यगृह दहा वर्षापासून अर्धवट अवस्थेत आहे. सर्व बगीचांची अवस्था अधिक वाईट आहे. या बागा सार्वजनिक न राहता बगलबच्चांना देऊन खाजगीकरण केले गेले. आता निवडणूक आल्यावर विकास कामांची जाग आली आहे. दीडशे कोटींच्या कामात रस्ता काँक्रिटीकरणाचे कामे चालू आहेत. ही सर्व विकास कामे दाखवून मतदारांना अशा वेगवेगळ्या माध्यमातून आकर्षित करायचा प्रयत्न सुरू आहे. नगरकर आपल्याबरोबर आहेत तर मग हा सर्व खटाटोप का सुरू आहे. अहिल्यानगरची जनता सुज्ञ आहे. त्यांना सर्व समजते. म्हणूनच आताच्या निवडणुकीत शहरात बदलाचे वातावरण असून अहिल्यानगर शहराच्या जनतेला आता नेतृत्वबदल हवा आहे. खोट्या विकासकामांना आता नगरची जनता बळी पडणार नाही, असेही भाजपा प्रदेश सदस्य वसंत लोढा यांनी पत्रकात म्हटले आहे.

---

### ६६ हजार ४०० रूपयांचा ऐवज चोरीस

## सह्याद्री चौकातील मोबाईल शॉपी फोडली

**समाचार/नगर-दि.२१**

चोरट्यांनी एमआयडीसीतील सह्याद्री चौकातील ओम मोबाईल शॉपी फोडून १५ डेमो मोबाईलसह ६६ हजार ४०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. सदरची घटना ८ ऑक्टोबर रोजी रात्री १० ते ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान घडली असून या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

वैभव भाऊसाहेब बोराडे (वय ३६, रा. सम्राटनगर, नवनागापूर) यांनी फिर्याद दिली आहे. बोराडे यांचे नागापूर एमआयडीसीच्या सह्याद्री चौकात ओम मोबाईल शॉपी आहे. त्यांनी ८ ऑक्टोबरच्या रात्री १० वाजता मोबाईल शॉपी बंद केली होती. त्यानंतर चोरट्यांनी शॉपीचा लोखंडी ग्रील पत्रा तोडून आत प्रवेश केला. ६६ हजार ४०० रूपये किमतीचे १५ डेमो मोबाईल चोरून नेले. दुसऱ्या दिवशी ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता बोराडे हे शॉपीत आले असता, त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यांनी १९ ऑक्टोबर रोजी एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

### नितीन भुतारे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

## करोडोंच्या निधीतून झालेली रस्त्यांची निकृष्ट कामे

**समाचार/नगर-दि.२१**

शहरात करोडो रूपये खर्चून तयार होणारे नवीन रस्ते खराब होत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते माळीवाडा रस्ता महिनाभरात खराब झाला आहे. या रस्त्यासाठी खर्च केलेले ४ कोटी रुपये पाण्यात गेले आहेत, अशी तक्रार नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते माळीवाडा रस्त्याचे काम १ महिना झाले पूर्ण होताना दिसत असताना, एका बाजुचा रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे .सिमेंट काँक्रिट करण्यात आलेल्या रस्तावर खड्डे पडून सिमेंट काँक्रिट उखडले आहे. त्यामुळे शासनाने दिलेले ४ कोटी रुपये पाण्यात गेले आहेत. शहर अभियंता, आयुक्त, लोकप्रतिनिधी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने करोडो रुपयांचा निधी वाया गेला, हे या विकास कामातून सिध्द होते. फक्त ठेकेदारांचे खिसे भरण्यासाठी शासन निधी देत आहे आणि आयुक्त त्यांच्या पाठीवर हात ठेवत आहेत, असा आरोप नितीन भुतारे यांनी केला. आनंद धाम ते स्वस्तिक चौक हा रस्ता खराब झाला असून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वी केलेली आहे. हा रस्ता ५ कोटी रुपये खर्च करून करण्यात आला आहे. त्या रस्त्याला तडे गेले आहेत, असे निवेदन आयुक्तांना दिले. परंतु आयुक्तांनी त्या ठेकेदारावर कुठलीही कारवाई केली नाही.

आयुक्त व शहर अभियंता हे भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून निविदा प्रक्रिया संगनमताने राबवून भ्रष्टाचार करतात. मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घालून संबंधित ठेकेदाराकडून खराब झालेले रस्ते पुन्हा नव्याने तयार करून घ्यावेत. तोपर्यंत ठेकेदार संस्थेला बिले अदा करू नयेत, अशी मागणी त्यांनी निवेदनाव्दारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

### भिंगार येथे गोरक्षनाथ महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा

**समाचार/नगर-दि.२१**

भिंगार येथील ओम शिव चैतन्य गोरक्षनाथ देवस्थान यांच्या सहयोगाने व ओम शिव चैतन्य गोरक्षनाथ महाराज यांच्या आशिर्वादाने भिंगार येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदीन उत्सव नुकताच मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने दर्शनाचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. या सोहळ्याचे आयोजन गुरुवर्य विजय महाराज चव्हाण यांच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी पूजा व महाभिषेक करण्यात आला. सर्वश्री दिनेश सरोदे, विशाल येंडे, आशिष रोहीदिया, आदित्य चव्हाण, पवन शिंदे, रवी कंडारे, नरेश कनोजिया, राजेश बहोत यांनी परिश्रम घेतले.

---

### नवोदित कलाकारांच्या प्रोत्साहानाची दखल

## घरघर लंगर सेवेतर्फे बोगावत सन्मानित



**समाचार/नगर-दि.२१**

कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेपासून शहरात सुरु झालेल्या घर घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयाला सातत्याने मदत करणारे व शहरातील नवोदित कलाकारांसाठी व्यासपीठ निर्माण करुन देण्याच्या उद्देशाने योगदान देणारे धनेश बोगावत यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

बोगावत यांचा जनक आहुजा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, रवी बक्षी, डॉ. संजय असणानी आदींसह घर घर लंगर सेवेचे सेवादार उपस्थित होते. जनक आहुजा म्हणाले की, घर घर लंगर सेवेच्या अन्न दानामध्ये धनेश बोगावत यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. हरजितसिंह वधवा म्हणाले की, शहराच्या सांस्कृतिक चळवळीला नेहमीच बोगावत यांनी पाठबळ दिले आहे. त्यांचे वडिल छगन बोगावत हे एक उत्तम कलाकार व संगीतप्रेमी होते. त्यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम धनेश बोगावत करत आहे. नवोदित कलाकारांना त्यांनी दिलेले पाठबळ दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना धनेश बोगावत म्हणाले की, घर घर लंगर सेवेच्या वतीने कोरोनाच्या टाळेबंदीपासून शहरातील लाखो गरजू घटकांना दोन वेळचे अन्न देऊन त्यांची भूक भागविली. या सेवा कार्यात बोगावत परिवाराने खारीचा वाटा उचलला असल्याचे त्यांनी सांगितले. हा सत्कार सेवा कार्य करण्यास बळ देणार असल्याची भूमिका स्पष्ट केली.

### केडगावमध्ये तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**समाचार/नगर-दि.२१**

केडगाव उपनगरातील तरूणाने राहत्या घरात सिलींग फॅनच्या लोखंडी हुकला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. नारायण केशव मोरे (वय ३२) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

नारायण मोरे यांनी शनिवारी (१९ ऑक्टोबर) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरी सिलिंग फॅनच्या लोखंडी हुकला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. याची माहिती मिळताच त्याच्या नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी सव्वा एक वाजता येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले.

तेथील डॉ. कुलकर्णी यांनी तपासणी करून त्यांचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले. अधिक तपास पोलीस अंमलदार भरत गाडीलकर करत आहेत.

### जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ

## अध्यक्षपदी पंडित,सोनवणे कार्याध्यक्ष, डोंगरे सरचिटणीस

**समाचार/नगर-दि.२१**



अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची जिल्हा कार्यकारणी व सर्वसाधारण सभा मातोश्री रु .दा .मालपाणी विद्यालय संगमनेर येथे अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली .यावेळी संघाचे माजी सरचिटणीस शांताराम डोंगरे उपस्थित होते. सदर सभेत पुढील पाच वर्षासाठी खालील प्रमाणे सर्वांनुमते जिल्हा कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.

अध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित नगर यांची फेर निवड करण्यात आली तर कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे (अकोले), सरचिटणीस मिथुन डोंगरे (पाथर्डी), संघटन मंत्री सचिव संजय लहारे (संगमनेर) कार्यालय मंत्री मंगेश जाधव (पारनेर), खजिनदार एम .जी .राऊत (पारनेर) उपाध्यक्ष राजेंद्र वाघ (पारनेर), आबासाहेब गडदे (आबा ) (राहुरी), बाळासाहेब सूर्यवंशी ( जंगले) . (श्रीगोंदा), बाळासाहेब वाघ (कर्जत), प्रकाश देशमुख (कोपरगाव), बालाजी गायकवाड (शेवगाव), आबासाहेब गडदे (राहुरी), सहसचिव उद्धव सोनवणे (नेवासा), एस .बी . उकिर्डे (अकोले), एस .एस .पवार (नगर तालुका), आर .एस .औताडे (श्रीरामपूर), निरंजन डांगे . राहता, शेख जमीर .नगर तालुका, विद्या सचिव सुनिल धुमाळ(अकोले), सहविद्या सचिव श्रीकृष्ण पवार (नगर), हिशोब तपासणी सौ . संगीता म्हस्के( संगमनेर),.महिला आघाडी प्रमुख –सौ. संगीता हासे (अकोले), उपाध्यक्षा ज्योस्ना शिंदे (नगर), सचिव डॉ.सुनिता पारे (कोपरगाव), इंग्रजी माध्यम प्रमुख गीता तांबे(नगर), रात्र शाळा प्रमुख सुनिल सुसरे(नगर), राज्य कार्यकारणी सदस्य दशरथ कोपनर (अकोले) सौ. शितल बांगर (नगर) सुनिल भोर (श्रीगोंदा), पुणे विभागीय सदस्य निवृत्ती इले (राहुरी) अशोक दौड ( पाथर्डी), संपादक भाऊसाहेब रोहकले (नगर तालुका) प्रमुख तज्ञ मार्गदर्शक प्राचार्य विजय पोकळे , उल्हास दुगड, प्रमोद तोरणे (भिंगार कॅन्टोन्मेंट), यशवंत भुतकर, कैलास काकडे, मार्गदर्शक– शांताराम डोंगरे, कळसकर , बापूसाहेब काळदाते, आनंता खेत्रे, श्री बी टी गमे, बाळासाहेब बनकर, बाळासाहेब वाकचौरे,दत्ता भांडवलकर,सौ. लता डांगे, अभिमन्यू चव्हाण, बा .ल. ठोकळ आदींचे बिनविरोध निवड करण्यात आली.

### पिकअप टेम्पोसह ९५० किलो गोमांस पकडले

## कत्तलखान्यावर कोतवाली पोलिसांचा छापा

**समाचार/नगर-दि.२१**

जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असलेल्या चौकात कोतवाली पोलिसांनी छापा टाकून १ लाख ९० हजार रूपये किमतीचे ९५० किलो गोमांस व चार लाखाची पिकअप (एमएच ०४ एलई ०४९७) असा ५ लाख ९० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. शुक्रवारी (१८ ऑक्टोबर) रात्री १२ वाजेच्या सुमारास ही कारवाई केली. या प्रकरणी पोलीस अंमलदार संभाजी कोतकर यांच्या फिर्यादीवरून शादाब गुलाम रसुल कुरेशी (वय २७, रा. कुरेशी मोहल्ला, झेंडीगेट) याच्याविरूध्द पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असलेल्या चौकात काही इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करण्यासाठी पिकअप मधून भरून नेले जात असल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली होती. त्यांनी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. उपनिरीक्षक पाटील यांनी पोलीस अंमलदारांना सोबत घेत शुक्रवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला असता ९५० किलो गोमांस व एक पिकअप मिळून आला. शादाब गुलाम रसुल कुरेशी याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार इनामदार करत आहेत.

---

### सणासुदीच्या काळात चोरट्यांकडून बंद घरांना लक्ष्य

## बोरूडे मळा, केडगावमध्ये भरदिवसा घरफोड्या



**समाचार/नगर-दि.२१**

ऐन सणासुदीच्या काळात चोरट्यांकडून दिवसा घरफोडी करून दागिने, रोकड लंपास केली जात आहे. शनिवारी (१९ ऑक्टोबर) तोफखाना हद्दीत एक तर कोतवाली हद्दीत दोन ठिकाणी घरातील दागिने, रोकड लंपास केल्याच्या घटना घडल्या आहेत. या प्रकरणी संबंधीत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

शुभांगी श्रीपाद दगडे (वय ३१) यांचे बोरूडे मळा, आराधना कॉलनीतील घरातून १५ हजाराची रोकड, सोन्याचे व चांदीचे दागिने, असा २२ हजाराचा ऐवज चोरून नेला. चोरी झाली त्या वेळी शुभांगी यांचे घर उघडे होते व त्यांच्या सासू एकट्याच घरात होत्या. चोरट्यांनी उघड्या घरातून आत प्रवेश केला व बेडरूम मधून ऐवज चोरून नेला. सदरचा प्रकार त्यांच्या सासूच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शुभांगी यांना सदरचा प्रकार सांगितला. त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. केडगाव उपनगरातील आदर्श हाईट्स, दुधसागर सोसायटी येथील दोन घरे चोरट्यांनी शनिवारी सकाळी सव्वा दहा ते दुपारी साडेबाराच्या दरम्यान फोडली. एका घरातून १७.५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने व एक हजाराची रोकड तर दुसऱ्या घरातून तीन हजाराची रोकड असा एकुण ५६ हजार ५०० रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी मनिषा अशोक वामन (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोरमा विनय काकडे यांचे घर शनिवारी सकाळी कुलूप लावून बंद केले होते. त्यानंतर चोरट्यांनी कुलूप तोडून घरातील सामानांची उचकापाचक केली व रोकड, दागिने चोरून नेले. सदरची घटना दुपारी साडेबारा वाजता लक्षात आली. कोतवाली पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### मुंबई शेअर भाव


**नव्याने खरेदीचा अभाव सेन्सेक्स निफ्टीमध्ये नाममात्र तेजी मंदी**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २१-१०-२०२४ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ८१३५४ |
| एसीसी | २३०७-०८ |
| एशियन पेंट | ३०५०-५१ |
| बजाज ऑटो लि. | १०५०१-०२ |
| बलराम फूड चिनी | ६३१-३२ |
| भारत फोर्ज | १४५०-५१ |
| क्रॉम्प्टन | ४०४-०५ |
| डीएलएफ | ८६१-६२ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६७३५-३६ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५५६-५७ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २७०४-०५ |
| आयटीसी लि. | ४८५-८६ |
| एल ॲण्ड टी लि. | ३६०५-०६ |
| रिलायन्स इंड. | २७४४-४५ |
| एसबीआय | ८१३-१४ |
| टाटा मोटर्स | ९०७-०८ |
| टाटा स्टील | १५५-५६ |
| टीसीएस | ४०९२-९३ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २७०-७१ |
| सुवेन फार्मा | १२७५-७६ |

# आठरे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन


**समाचार/नगर-दि.२१**

सावेडी येथील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात इतरांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे व शैक्षणिक विकासाच्या कार्याचा सदोदित ध्यास घेतलेले थोर स्वांतत्र्य सैनिक कै.माजी खा.चंदभान आठरे पाटील आणि माजी प्राचार्य व शैक्षणिक सल्लागार स्व.विलासराव आठरे पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.अनिल आठरे, विश्वस्त डॉ.अदिती आठरे, सी. ई. ओ संजय आठरे, मंजुषा आठरे, मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यपेक्षिका व सर्व शिक्षकवृंद-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. अनिल आठरे, संजय आठरे व सर्व विश्वस्त यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन करुन भजन व गीत सादर केले. शाळेचा विद्यार्थी जांगिड हिमांशू याने सरांच्या आठवणींना उजाळा दिला. तर घोरपडे अनिता व चक्रनारायण सलविना यांनी आठरे यांच्या सरांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

त्यांनी आपलया मनोगतात आदरणीय सर हे अभ्यासू व्यक्तिमत्व, आदर्श शिक्षणतज्ञ व त्यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सुरु झालेल्या जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालये आज प्रगतीची नवी शिखरे सर करीत आहेत असे सांगून मा. खा. चंदभान आठरे पाटील आणि मा. प्राचार्य विलासराव आठरे पाटील यांच्या राजकीय,सामाजिक व शैक्षणिक कार्याचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार निचित एस.व्ही.यांनी केले.

# अहमदनगर महाविद्यालयात मतदार जागृतीवर डॉ. वाडेकर यांचे व्याख्यान



**समाचार/नगर-दि.२१**

अहमदनगर महाविद्यालयात मतदार जागृती या महत्त्वपूर्ण विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या उपक्रमाचा उद्देश लोकशाहीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मतदान प्रक्रियेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सुधीर वाडेकर यांनी आपल्या सखोल मार्गदर्शनातून मतदारांच्या हक्क, जबाबदार्यां आणि मतदान प्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विशेषतः तरुण मतदारांना उद्देशून मतदानाचा अधिकार आणि कर्तव्ये समजावून सांगितली. मतदानाच्या माध्यमातून समाजात कसे सकारात्मक बदल घडवता येतात, याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता कशी राखली जाते याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमात उपप्राचार्य नोएल पारगे, रजिस्टर पीटर चक्रनारायण, ई.टी. आय.समन्वयक डॉ. गोकुळदास गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पोपट सिनारे, डॉ. प्रबंधिका शेलार, डॉ. रविंद्र मते, डॉ.पवनजित छाबडा आणि प्रा. संतोष कांबळे हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग म्हस्के यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. तर आभार प्रदर्शन यश कच्छवा यांनी केले.

# अशोकभाऊ फिरोदिया उद्योग व शिक्षण क्षेत्रातील दूरदर्शी नेतृत्व



**औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, क्रीडा क्षेत्रात आपल्या कुशल प्रशासकीय कारभारामुळे राज्यभरात नावलौकिक मिळविलेले तसेच शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारी निर्णय घेणारे दिवंगत अशोकभाऊ फिरोदिया यांचा २२ ऑक्टोबर हा स्मृतिदिन. उद्योग क्षेत्रातील धाडसी, करारी तसेच पारंपारिक मूल्यांची जोपासना करत नाविन्याचा ध्यास घेणारे अशोकभाऊ फिरोदिया यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारा हा विशेष लेख.**

देशाच्या स्वांतत्र्य लढ्यात मोठे योगदान देणाऱ्या तसेच राज्य व देश पातळीवरील औद्योगिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक कार्यात मोठे योगदान देणाऱ्या फिरोदिया कुटुंबात २ ऑक्टोबर १९४४ रोजी अशोकभाऊ फिरोदिया यांचा जन्म झाला. महाविद्यालयीन शिक्षणानंतर मॉर्डन फौंड्रीमध्ये त्यांनी उद्योग व्यवसायास सुरुवात केली. त्यांनी अल्पावधीतच आपल्या कर्तुत्वावर कार्यकुशल, शिस्तप्रिय व आदर्श उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविला. उद्योगधंदे वाढले पाहिजेत, कामगारांना काम मिळाले पाहिजे, समाजाची उन्नती झाली पाहिजे या उदात्त विचारांनी त्यांनी उद्योग व्यवसायांची उभारणी केली. उद्योग व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या इतर छोट्या मोठ्या व्यावसायिकांचीही भरभराट व्हावी यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असायचे. अशोकभाऊ फिरोदिया हे उद्योग क्षेत्रातील नामांकित नेतृत्व म्हणून समाजात ओळखले जायचे.

अशोकभाऊ फिरोदिया यांनी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह म्हणून सुमारे पंचवीस वर्षे धुरा सांभाळली. त्याचबरोबर नगर शहरातील नगर अर्बन बँक, मर्चंट बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात मोठे काम केले. ग्राहक भांडार सारख्या आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या संस्थेला उर्जितावस्था प्राप्त करून देत नफ्यात आणले. नगर व केडगाव औद्योगिक वसाहतीत उद्योग व्यवसाय वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. वृद्धाश्रम, लायन्स व जायंट्स सारख्या सामाजिक संघटनांच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवले. फुटबॉल, क्रिकेट, मल्लखांब असोसिएशन सारख्या क्रीडा संघटनांना पथदर्शी नेतृत्व देत अनेक खेळाडूंना राज्य व देश पातळीवर क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून दिली.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह म्हणून काम करताना तसेच पाथर्डी येथील तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद सांभाळताना विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना शिक्षणाचा आधुनिक दृष्टिकोन दिला. त्यांनी जुन्या परंपरांबरोबर नाविन्यपूर्णता अंगीकारत आधुनिकता जोपासली. काळाची गरज ओळखून कौशल्याधिष्ठित विद्यार्थी तयार झाला पाहिजे यासाठी ते नाविन्याचा अंगीकार करत असत. परिवर्तन हा त्यांचा स्थायीभाव होता. पहिलीपासून इंग्रजी व संगणक शिक्षण सुरू केले. राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने फिरोदिया पॅटर्नची दखल घेतली. सुमारे चार वर्षांनी राज्यातील सर्व शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी शिक्षण सुरू करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमध्ये दहावीनंतर इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेताना न्यूनगंड तयार होत होता. अशोकभाऊ फिरोदिया यांनी संस्थेच्या शाळांमधून आठवीपासून गणित व शास्त्र विषय इंग्रजी माध्यमातून शिकविण्यास सुरुवात केली. त्यानंतर पुढे सेमी इंग्रजीचा बोलबाला सुरू झाला. ते नेहमी म्हणत माझ्या संस्थेतील सर्व शिक्षक हे आदर्श शिक्षक आहेत. अहमदनगर शिक्षक एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमध्ये राबविले जाणारे शालेय उपक्रम, परीक्षांचे नियोजन, स्पर्धांचे नियोजन हे फिरोदिया पॅटर्न म्हणून शैक्षणिक वर्तुळात चर्चिले जाते याचे सर्व श्रेय अशोकभाऊ फिरोदिया यांना जाते.

१९९० च्या सुमारास अशोकभाऊ फिरोदिया यांच्यावर बायपास सर्जरी झाली होती. त्यानंतर त्यांनी कामाचा व्याप कमी केला होता. अशा परिस्थितीतही अनेक लोक त्यांच्याकडे मार्गदर्शन घेण्यासाठी येत असत. अशोकभाऊ फिरोदिया यांनी संस्थेसाठी दिलेल्या योगदानातून उतराई होण्यासाठी सर्व शाळांच्या शिक्षकांनी व स्नेही जणांनी रौप्यमहोत्सवी वर्षाचा योग साधून २ ऑक्टोबर २००० रोजी त्यांचा वाढदिवस मोठ्या दिमाखात साजरा केला होता. सुमारे चार तास चाललेल्या अतिशय भावपूर्ण कार्यक्रमात त्यांनी शिक्षकांशी संवाद साधत शुभेच्छा स्वीकारल्या. २२ ऑक्टोबर २००० या दिवशी अशोकभाऊ फिरोदिया यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. संपूर्ण औद्योगिक, सामाजिक, अर्थिक, शैक्षणिक वर्तुळात शोककळा पसरली.

अशोकभाऊ फिरोदिया यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी छायाताई फिरोदिया या प्रमुख कार्यवाह पदाची धुरा सांभाळत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधून सुमारे हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या शाळांमधील विद्यार्थी यशाची शिखरे पादाक्रांत करत आहेत. अशोकभाऊ फिरोदिया यांनी आखून दिलेल्या मार्गानुसार सर्व शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे प्रत्येक पालकांना आपल्या पाल्याच्या भवितव्यासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधून प्रवेश हवा असतो. यासाठी राजकीय, प्रशासकीय, औद्योगिक अशा सर्वच क्षेत्रांतील उच्चवर्गीय पालक आपल्या पाल्याला प्रवेश मिळविण्यासाठी धडपडत असतात.

नगर शहराच्या जडणघडणीत अशोकभाऊ फिरोदिया यांनी सर्वच क्षेत्रात मोठे काम केले. नगर शहरातील वाटचालीचा इतिहास लिहिला जाईल त्यावेळी त्यांच्या कार्यकर्तृत्वासाठी एक सुवर्णपान नक्कीच द्यावे लागेल.

**- नितीन देशमुख**
अध्यक्ष - अहमदनगर
जिल्हा जाहिरातदार संघटना

# सुदर्शन फार्मा इंडस्ट्रीजची ईश्वरी हेल्थकेअरमधील ५१% स्टेक खरेदीला मान्यता

सुदर्शन फार्मा इंडस्ट्रीज लिमिटेड (BSE: 543828), रासायनिक आणि औषधी व्यवसायात एक प्रमुख नाव असलेली कंपनी असून त्यांच्या मंडळाने ईश्वरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे ५१.00% च्या २,०९,१00 इक्विटी-समभाग घेण्यास मान्यता दिली आहे. कंपनीचे पेड अप इक्विटी शेअर भांडवल आणि शेअर खरेदी करार संपादन पूर्ण झाल्यावर, ईश्वरी हेल्थकेअर कंपनीची उपकंपनी बनेल. ईश्वरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड ही एक प्रगतीशील आणि नाविन्यपूर्ण कंपनी आहे जी स्पर्धात्मक किमतीत आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत उच्च सेवा, वापरकर्त्यासाठी अनुकूल आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा डिस्पोजेबल आणि उपकरणे प्रदान करून जागतिक बाजारपेठेत सेवा देण्यासाठी समर्पित आहे. नाविन्यपूर्णता आणि सर्जनशीलतेच्या भावनेसह तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम वापर करून, ईश्वरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड जागतिक ग्राहकांच्या गरजा अधिक प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी जागतिक दर्जाची उत्पादने प्रदान करते. तत्पूर्वी, कंपनीने जाहीर केले की तिच्या बोर्डाने कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या उप-विभागा/विभाजनाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, म्हणजे १ शेअरचे १0 शेअर्समध्ये उपविभाग, भागधारकांच्या मान्यतेच्या अधीन आहे आणि अशा इतर मंजुरी आवश्यक आहेत. अलीकडेच, कंपनीने नवीन उपकंपनी सुदर्शन मावेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड समाविष्ट केली आहे. उपकंपनीचा मुख्य उद्देश सर्व प्रकारच्या औषधी, आरोग्यसेवा, आयुर्वेदिक आणि आहारातील पूरक उत्पादने तयार करणे, प्रक्रिया करणे, विकसित करणे, परिष्कृत करणे, आयात करणे, निर्यात करणे हा आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे आरोग्य आणि अधिकारासाठी खाजगी क्षेत्राची वचनबद्धता!

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड (UNFP) ने व्यवसायात पुनरुत्पादक न्यायासाठी युतीचा भारत अध्याय अधिकृतपणे सुरू करण्यासाठी मुंबईत उच्चस्तरीय खाजगी क्षेत्रातील गोलमेज आयोजित केले. कामाच्या ठिकाणी महिलांचे आरोग्य आणि लैंगिक समानतेकडे लक्ष देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. २०२२ मध्ये स्थापित आणि जानेवारी २०२३ मध्ये दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये लॉन्च केले गेले, व्यवसायातील पुनरुत्पादक न्यायासाठी गठबंधन हा लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य आणि अधिकारमध्ये कॉर्पोरेट गुंतवणुकीला गती देण्यावर लक्ष केंद्रित करणारा एक बहु-भागधारक उपक्रम आहे. हे महिलांचे आरोग्य, कामाच्या ठिकाणी समानता आणि आर्थिक वाढीसाठी व्यवसायांची भूमिका यावर जोर देते. खाजगी क्षेत्रातील धोरणांना आणखी समर्थन देण्यासाठी, UNFP ने खाजगी क्षेत्रातील पुनरुत्पादक आरोग्य आणि अधिकारांना पुढे नेण्यासाठी एक मापन फ्रेमवर्क आणि मेट्रिक्स प्रकाशित केले आहेत आणि हे मेट्रिक्स व्यवसायांना त्यांच्या यशाचा मागोवा घेण्यात, मोजण्यात आणि अहवाल देण्यात मदत करू शकतात. या प्रकाशनामध्ये आरोग्य आणि निरोगीपणाच्या धोरणांमध्ये सध्याच्या परिपक्वतेचे मूल्यांकन करण्यासाठी, दत्तक घेण्याच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यासाठी आणि लक्ष्यित आरोग्य उपक्रमांचे आर्थिक फायदे मोजण्यासाठी गुंतवणुकीवर परतावा साधने समाविष्ट आहेत. भारत स्वतःला $30 ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनवण्याच्या स्थितीत असताना, $14 ट्रिलियन १ च्या संभाव्य योगदानासह महिलांचा आर्थिक सहभाग महत्त्वाचा आहे. UNFP च्या कार्यकारी संचालक डॉ. नतालिया कानम यांनी शीर्ष व्यावसायिक नेत्यांना एकत्र आणण्यासाठी गोलमेजाचे आयोजन केले. गोलमेजमध्ये आयकेईए, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुप, महिंद्रा अँड महिंद्रा, बायर, शाही एक्सपोर्ट्स, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि टाटा मोटर्स, ल्युपिन, वेलस्पन, फ्लिपकार्ट, कोंग्सबर्ग मेरीटाईम, टू नॉर्थ, वोक्हार्ट आणि VPN सारख्या कंपन्यांचे उच्चस्तरीय नेते आणि प्रतिनिधींचा समावेश होता.

# पवना इंडस्ट्रीजच्या बोर्डाची ४१०.८१ कोटी रुपयांपर्यंत निधी उभारण्यास मान्यता

पवना इंडस्ट्रीज लिमिटेड (BSE: 543915, NSE: PVNIND), नामांकित OEM साठी विश्वासार्ह आणि उच्च दर्जाच्या ऑटोमोटिव्ह पार्ट्सच्या विस्तृत श्रेणीच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या एका अग्रगण्य कंपनीने जाहीर केले आहे की परिवर्तनीय वॉरंटचे प्राधान्य इश्यू, भागधारकांच्या मान्यतेच्या अधीन असेल किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरण इत्यादी, बोर्डाने आपला निधी INR 410.81 कोटी इतका वाढवला आहे. प्रस्तावित वाटपांमध्ये एफएलएल उनिको, ग्लोबल ओपोच्युनिटीज फंड्स लिमिटेड, Nexpact Ltd, नॉर्थ स्टार ओपोच्युनिटीज फंड व्हीसीसी, एमिनंस ग्लोबल फंड पीसीसी, G डायनॅमिक फंड्स लिमिटेड इत्यादींचा समावेश आहे.

बोर्डाने पुढे परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांची धारण मर्यादा कंपनीच्या पेड-अप इक्विटी कॅपिटल/मतदान अधिकारांच्या ४९% पर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली. सदस्य आणि इतर लागू मंजुरींच्या अधीन हि मंजुरी आहे.

पवना इंडस्ट्रीज लिमिटेड नामांकित जएच साठी विश्वासाई आणि उच्च दर्जाचे ऑटोमोटिव्ह भाग तयार करण्याच्या व्यवसायात गुंतलेली आहे, प्रवासी वाहने, दुचाकी, तीन-चाकी, अवजड आणि हलकी व्यावसायिक वाहने आणि ऑफ-रोड वाहनांसह विविध वाहन विभागांना सेवा देत आहे. पवना ही दक्षिण आशियाई ऑटोमोटिव्ह उद्योगातील एक सुस्थापित कंपनी आहे ज्याचा ५० वर्षांहून अधिक कालावधीचा नाविन्य, तंत्रज्ञान, उत्पादन आणि बाजार नेतृत्वाचा दीर्घ इतिहास आहे. कंपनीचे अलिगढ (उत्तर प्रदेश), औरंगाबाद (महाराष्ट्र) आणि पंतनगर (उत्तराखंड) येथे स्वतःचे अत्याधुनिक उत्पादन कारखाने आहेत. हे प्लांट त्याच्या OEM ग्राहकांच्या प्लांटच्या अगदी जवळ आहेत, ज्यामुळे ग्राहकांशी अधिक चांगला संवाद साधता येतो आणि त्यांच्या गरजांना वेळेवर प्रतिसाद मिळतो. यामध्ये इग्निशन स्विच, फ्युएल टँक कॅप, लॅचेस, ऑटो लॉक, स्विच आणि बरेच काही समाविष्ट असलेल्या उत्पादनांच्या पोर्टफोलिओची विस्तृत श्रेणी देखील आहे.

# वित्तीय साक्षरतेला चालना देण्यासाठी आर्थाजेनिक्स एक्स्पोचे आयोजन




बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (नेस्को) येथे आयोजित आर्थाजेनिक्स एक्स्पोच्या पदार्पणात उद्योग क्षेत्रातील नेते, नियामक प्राधिकरणे आणि वित्तीय इनोव्हेटर्स एकत्र आले आहेत. दोन दिवस चाललेल्या या एक्स्पोमध्ये तरुण गुंतवणूकदारांपासून अनुभवी उद्योजकांपर्यंत सर्वांनी हजारोंच्या संख्येने उपस्थिती लावली होती. ते सर्व आर्थिकदृष्ट्या सुरक्षित भविष्य घडविण्यासाठी मौल्यवान दृष्टी आणि कौशल्ये मिळविण्यासाठी उत्सुक होते. सेबीचे कार्यकारी संचालक व्ही. एस. सुंदरेशन, एनएसई, बीएसई, एमसीएक्सचे प्रतिनिधी तसेच, सीडीएसएल, एनआयएसएम, शेअरखान, अपस्टोक्स, पीजीआयएम म्युच्युअल फंड, एचडीएफसी सिक्युरिटीज आदी प्रमुख वित्तीय कंपन्यांचे प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले होते. या नेत्यांनी आर्थिकदृष्ट्या साक्षर भारताला चालना देण्यासंबंधीचे विचार मांडले आणि दीर्घकालीन आर्थिक कल्याणासाठी सुलभ वित्तीय शिक्षण आणि धोरणात्मक गुंतवणुकीची गरज असल्याची भूमिका मांडली. उपस्थितांनी प्रत्यक्ष कार्यशाळांमध्ये भाग घेतला, संवादात्मक प्रदर्शन आणि चर्चासत्रांचा आनंद घेतला. यावेळी रिअल-टाईम सिम्युलेशनद्वारे गुंतवणूक धोरणांची चाचणी घेण्यात आली. या सत्रांमध्ये सहभागी झालेल्यांना मैत्रीपूर्ण पद्धतीने गुंतवून ठेवण्यात आले होते. गुंतवणूकदारांच्या मॅचमेकिंग सत्रांबरोबरच ज्ञान आणि कृती यांच्यातील दरी भरून काढण्यास मदत झाली आणि सहकार्य आणि भविष्यातील उपक्रमांसाठी संधी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. अंकित अजमेरा यांनी आपल्या प्रास्तविकात देशातील वित्तीय साक्षरतेत सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.

# शब्दखेळ - २६०

**खाली दिलेल्या चौकोनात महिला मंगलागौरीमध्ये खेळतात ते खेळ लपलेले आहेत. शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| फु | था | क | र | वं | टी | न | आ |
| ग | ला | ट | बा | ई | ला | ट | गो |
| डी | स | पु | ब | स्क्रु | ड | अ | टा |
| त्ता | गो | फ | टा | ती | व | हि | पा |
| झि | चा | री | ट | क | गा | दु | गो |
| म्मा | र | न | व | या | ठो | स्ता | टा |
| र्मा | टि | प | न्या | ळ | डे | न | ल्या |
| त | वा | म | सा | ळुं | खी | हा | र |

**शब्दखेळ - २५९ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| का | आ | गा | ढ | व | र्ला | स | सा |
| ळ | सु | द्रा | सा | खु | श | बु | र्भे |
| वी | गं | ह | य | जि | री | ळ | ह |
| ट | ध | री | क | रा | ब्रा | पे | त्ती |
| मो | मा | ण | ल | फ | ल | रू | न |
| गा | ल | घ | वा | ओ | क्ष्मी | र | घो |
| य | व | ब | टा | टा | र | स्प्रे | डा |
| पे | के | उं | ट | र्डी | मी | र | ची |

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

# घुसखोर मुक्त महाराष्ट्रासाठी दक्ष रहा -चव्हाणके

समाचार/संगमनेर-दि.२१

नागरिकांनी आपापल्या घरी, कंपनीत व दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नागरिकत्व स्वतः तपासावे. केवळ भारतीय नागरिकत्व असलेल्यांनाच कामावर ठेवावे. जनताएनआरसीअंतर्गत या घुसखोरांची ओळख पटविणे आणि त्यांनादेशातूनहाकलूनद ऊनमहाराष्ट्राला घुसखोर मुक्त राज्य करण्यासाठीसर्वांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन हिंदुत्ववादी नेते सुरेश चव्हाणके यांनी पत्रकार परिषदेत केले.



सुरेश चव्हाणके यांची शिवप्रेरणा यात्रेचे नगरमध्ये आगमन झाल्यावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी सुधीर लांडगे, कर्नल नरेश गोयल व परदेशी आदी उपस्थित होते. चव्हाणके म्हणाले, हे अभियान मुस्लिम विरोधात नसून भारतात जो कोणी बेकायदेशीर पणे राहत असेल त्यांना कायद्याने देशा बाहेर काढण्यासाठी ही मोहीम आहे. देशातील मुस्लीम जनतेनेही आमच्या बरोबर येऊन घुसखोरांना देश बाहेर काढण्यासाठी सहकार्य करावे. केवळ राज्यातून या घुसखोरांना बाहेर काढले तर ४० लाख स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे सर्व जनतेने जागरूक होणे आवश्यक आहे.

या लोक अभियानांतर्गत आम्ही सर्व जनतेला केवळ भारतीय नागरिकत्व असलेल्या नागरिकांचा कामावर ठेवावे. तसेच जात, धर्म न पहाता राज्यातील सर्व ग्राम पंचायतीच्या सरपंचांनी आपापल्या गावाची नागरिकत्व तपासणी करावी. यामाध्यमातून हळूहळू सर्व गाव, तालुका, शहर, राज्य व नंतर देशात नागरिकत्व तपासण्याची मोहीम सुरु होण्यासाठी हे अभियान आहे. आजपर्यंत महाराष्ट्रातून सुरु झालेले सर्व आंदोलने यशस्वी झाले आहेत. त्यामुळे शिव प्रेरणा उपक्रमांतर्गत सजग रहो हे अभियान राज्यातून सुरु केले आहे, असे सुरेश चव्हाणके यांनी सांगितले. सुधीर लांडगे यांनी प्रास्ताविक केले.



# खेळामुळे सरकारी नोकरीत प्राधान्य - ॲड.आठरे

समाचार/नगर-दि.२१

मैदानी स्पर्धेमुळे मुलांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होणार आहे. येणाऱ्या काळात मुले शारीरिक दृष्ट्या सक्षम होतील. स्पर्धे तून मुलांमध्ये खेळाची आवडत निर्माण होणार आहे. खेळामुळे सरकारी नोकरीतही प्राधान्य असून, व प्रशिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी शुभेच्छा दिल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अहमदनगर जिल्हा क्रीडा विभाग आणि न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो-खो (मुले) स्पर्धा वेळी आठरे बोलत होते .यावळी खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, प्राचार्य .बी. बी. सागडे, उप प्राचार्य जे. ई. आठरे, डॉ. शरद मगर, डॉ.धोपावकर, डॉ.संतोष भुजबळ ,प्रा.बागुल, मनीषा पुंडे, डॉ.किसन अंबाडे, प्रा.अमन बगाडे, प्रा योगिता खेडकर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य.बी. बी. सागडे यांनी केले.मुलांना शिक्षणाबरोबर खेळालाही महत्त्व देवून अभ्यास व खेळ याची सांगड घालून वाटचाल केल्यास शैक्षणिक जीवनाचा आनंद लुटता येणार असल्याचे सांगितले. खेळाडूचे स्वागत जिमखान प्रमुख डॉ. शरद मगर यांनी केले. प्रा.सुनीता मोठे यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन जिमखाना कमिटीचे अध्यक्ष डॉ.पंडीत यांनी मानले.

# आयएमएसमध्ये पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

समाचार/नगर-दि.२१

आयएमएस संस्थेतील एम.बी.ए. विभागाचा पालक शिक्षक मेळावा शुक्रवारी उत्साहात संपन्न झाला. पालक शिक्षक मेळावासहसा शालेय स्तरावर घेतला जाणारा कार्यक्रम आहे. परंतु मागील अनेक वर्षांपासून आय.एम.एस. हा कार्यक्रम यशस्वीरित्या घेऊन पालकांशी संवाद साधते.

या मेळाव्यात शंभराहून अधिक पालकांनी उत्साहात हजेरी लावली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ.एम.बी.मेहता यांनी सर्वांचे स्वागत केले व भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीचा वारसा लाभलेल्या आयएमएस संस्थेविषयी सखोल माहिती दिली. व्यवस्थापन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे यांनी विभागातील शिस्त, वर्तणुक तसेच पालकांकडुन अपेक्षा याविषयी माहिती दिली. प्रथम वर्ष समन्वयक



यावेळी अध्यापक वृंदाने पालकांशी थेट संवाद साधत प्रा. सय्यद मुदस्सर यांनी विभागातील विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्लेसमेंट ऑफिसर सुरेश खन्ना यांनी प्लेसमेंट संदर्भात माहिती दिली. त्यांचे शंकानिरसन केले. यावेळी डॉ.ऋचा तांदूळवाडकर, डॉ.मनोज कुलकर्णी, प्रा.अश्विनी थोरात, डॉ.राहुल खंडेलवाल, डॉ. हर्षवर्धन भावसार, प्रा.विजय शिंदे, प्रा.साक्षी मध्यान, प्रा.पूनम तिवारी आदी उपस्थित होते. सदर मेळाव्याचे समन्वयक म्हणून डॉ हातीम कय्युमी यांनी काम पाहिले.

## माऊंट लिटेरा शाळेला आयुक्तांची भेट

# संवादातून मुलांना दिला स्वच्छतेचा संदेश

समाचार/नगर-दि.२१

अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांनी माउंट लिटेरा झी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका यास्मिन काझी यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांचे शाळेतर्फे स्वागत केले. या भेटीदरम्यान माउंट लिटेरा झी स्कूल सारसनगर या शाळेच्या संचालिका स्वाती कानडे तसेच मिलिंद कानडे व रामदास कानडे हे उपस्थित होते.



डांगे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची महती समजावून सांगताना विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संवाद साधला, स्वच्छतेच्या अभावी पसरणाऱ्या डेंग्यू पासून बचावासाठी स्वच्छता कशी राखावी तसेच कचरा व्यवस्थापन कसे करावे. याबद्दल योग्य आणि विद्यार्थ्यांना कळेल अशा शब्दांत त्यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय आता येऊ घातलेला दिवाळी सण सर्वांनी उत्साहात साजरा करावा परंतु पर्यावरण प्रदूषण होणार नाही याची काळजी घेऊन सण साजरा कसा करावा याचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका काझी यांनी आयुक्त डांगे यांची ओळख करून दिली संचालिका स्वाती कानडे यांनी आपल्या भाषणात पर्यावरण संरक्षण हि संपूर्णतः आपली सर्वांची जबाबदारी आहे या भावनेतून आपण यापुढे जबाबदारीने वागले पाहिजे तरच आपण आपल्या पुढील पिढीला एका सुंदर आणि प्रदूषणविरहित पर्यावरणाचे हस्तांतरण करू शकू असे सांगितले तसेच पर्यावरण रक्षणासाठी सर्वांना त्यांनी 'माझी वसुंधरा शपथ' घेण्यास लावली.

## केशव दामोदर जोशी सांस्कृतिक सभागृहाचे उद्घाटन

# यशासाठी सभागृह फायदेशीर - प्रा. मोडक



समाचार/नगर-दि.२१

श्रीमती कमलाताई जोशी व डॉ. विद्याधर पुंडे यांच्या योगदानातून अद्यावत असे सभागृहाची निर्मिती झाली आहे.कमलताई जोशी यांनी दाखवलेल्या दातृत्वामुळे सिताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या कलाक्षेत्रात वाटचाल करण्यासाठी कै.केशव दामोदर जोशीहे सभागृह निर्माण झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आनंदाचा मळा फुलला आहे.

सभागृहाचा योग्य उपयोग करून विद्यार्थी तुमच्या मनोकामना पूर्ण करतील. वक्तृत्व स्पर्धा, नाट्य, संगीत, कला अशा विविध क्षेत्रात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक सभागृहाचा उपयोग होईल, असे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी केले. बागडपट्टी येथील हिंदसेवा मंडळाचे सीताराम सारडा विद्यालयात केशव दामोदर जोशी या नुतन सभागृहाचे उद्घाटन कमलताई दामोदर जोशी व डॉ.विद्याधर पुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक होते. तर प्रमुख उपस्थितीत हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस,सीताराम सारडा विद्यालयाचे माजी अध्यक्ष प्रा.मकरंद खेर, अध्यक्ष अजित बोरा, कार्यकारणी सदस्य सुमतीलाल कोठारी, जगदीश झालानी, रणजीत श्रीगोड, वैशाली जोशी, शालेय समिती सदस्य ईश्वर बोरा, सचिन चोपडा, ॲड. दीपक शर्मा, स्मिता तिखे, ॲड. मंगला कोठारी, सुधाकर तिखे, डॉ.मनोहर देशपांडे, किशोर खुरंगे, माजी मुख्याध्यापिका बोगावत, निर्मला भंडारी,संजय मुदगल,विठ्ठल उरमुडे, सहाय्यक सचिव बि.यु. कुलकर्णी,विलास साठे, शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल ढगे, पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी, सुनील कुलकर्णी, दीपक आरडे, नितीन केणे, दीपक शिरसाठ,रवींद्र चोभे, अमोल कदम, अशोक डोळसे, गोवर्धन पांडुळे, आदींसह शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.विद्याधर पुंडे, संजय जोशी, कमला जोशी, मकरंद खेर यांचीही भाषणे झाली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक विठ्ठल ढगे म्हणाले, सीताराम सारडा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सभागृहाची निर्मिती झाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रगतीत निश्चितच भर पडेल.याचे सर्व पुण्य कमलाताई जोशी व परीवाराला मिळेल.

## मेहतर समाजातील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

# विश्वासाच्या बळावर संग्राम रिंगणात - अरुण जगताप



समाचार/नगर-दि.२१

शहराची अवस्था बदलत कोट्यवधी रुपयांच्या विकास कामांच्या माध्यमातून आ. जगताप यांनी शहराला वेगाने विकासाच्या वाटेवर नेले आहे. केलेल्या विकास कामांच्या मुद्यावरच आ.संग्राम जगताप तिसऱ्यांदा विधानसभा लढवत आहेत. शहराच्या विकासाबरोबरच शहरातील सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न सोडवण्यास आ.जगतापांनी प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व जनतेच्या आशीर्वादाच्या व विश्वासाच्या बळावरच ते पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत. मेहतर समाजातील शेकडो नागरिकांनी राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश करून आ.जगतापांचे हात बळकट केले आहेत, असे माजरी आमदार अरुण जगताप यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नालेगाव, भिंगार, वसंत टेकडी, सिद्धार्थनगर, सावेडी, पाईपलाईन रोडसह विविध भागांमधील वाल्मिकी मेहतर समाजातील शेकडो महिला व नागरिकांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षात मध्ये प्रवेश केला. अरुण जगताप यांनी पक्षाचे उपरणे घालून सर्वांचे पक्षात स्वागत केले. मुन्नाबाई चावरे यांचे भाषण झाले.

कार्यक्रमास छावणी परिषदेचे माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, प्रवीण घावरी, प्रमोद आठवल, विशाल झुंज, शुभम टाक, रवी गोहेर, राजेश तेजी, रोहित बागडी, सनी खरारे, सचिन बागडी, मनोज बागडी, करण वाणे, हर्षल सारसर, श्रीराज चव्हाण, संदीप लखन, टिंकू चव्हाण, सुमित गोहेल, रितेश निधाने, आशिष तेजी, आकाश करोलीया, बाबासाहेब सारसर आदी उपस्थित होते.

## 'यहा के हम सिकंदर'

# अनोखा उपक्रम शुक्रवारी

समाचार/नगर-दि.२१

बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित व अहमदनगर शाखा संचलित दिव्यांगांसाठी यहा के हम सिकंदर हा अनोखा उपक्रम येत्या शुक्रवारी २५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०: ३० वाजता माऊली सभागृह येथे प्रसिद्ध अभिनेत्री व बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ड.निलम ताई शिर्के-सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा केला जाईल अशी माहिती नगर शाखेच्या अध्यक्षा उर्मिला लोटके यांनी दिली.

या कला महोत्सवात दिव्यांग मुलांसाठी एकल तसेच समूह गीतगायन, नृत्यसादरीकरण, वाद्य वादन व विविध कला दर्शन आदी कार्यक्रम सादर होणार आहे. यासाठी जिल्हाभरातून २५० ते ३०० दिव्यांग , विशेष मुले सहभागी होणार आहेत. सहभागी प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी मानदेय व स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे. तसेच दिव्यांग मुलांच्या प्रशिक्षकांचा सत्कार केला जाणार आहे. यावेळी अनाम प्रेम या अंधमुलांच्या काळजीवाहू संस्थेतर्फे गाण्याचा विशेष कार्यक्रम सादर केला जाईल अशी माहिती महोत्सव प्रमुख विराज अडगटाला यांनी दिली.

जल्लोष लोककलेचा या लोककला महोत्सवानंतर लगेच दिव्यांग व विशेष मुलांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी बालरंगभूमी परिषदेने यहा के हम सिकंदर हा महोत्सव महाराष्ट्रातल्या सगळ्या जिल्ह्यात आयोजित केला जात आहे. त्यास उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने भविष्यात दर वर्षी हा महोत्सव साजरा करण्याची योजना असल्याचे मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी सांगितले.

## पक्ष वैभव जपण्याचे आवाहन; कचऱ्याची विल्हेवाट

# पक्षीमित्रांनी कापूरवाडीत राबविली स्वच्छता मोहीम

समाचार/नगर-दि.२१

पक्षीमित्रांनी एकत्र येत कापुरवाडी तलावाचा किनारा स्वच्छ केला. पक्षीमित्रांचा तलाव म्हणून ओळख असलेल्या नगर शहराजवळच्या प्राचीन कापुरवाडी तलावात यंदा पाऊस चांगला झाल्याने मोठ्याप्रमाणावर पाणी साठा आहे. या तलावाच्या पाण्यात नागरिक प्लास्टिक च्या प्लास्टिक पिशव्यात घालून निर्माल्य,देवतांच्या मुर्त्या, नारळ तसेच फोटो विसर्जित करतात. तसेच या भागात येणारे पर्यटक या भागात प्लास्टिक, मद्याच्या बाटल्या टाकतात यामुळे तलावाच्या परिसरात सर्वत्र अस्वछता निर्माण होते. जैविक परिसंस्थेवर याचा दुरगामी परिणाम होतो. नगर मधील अहमदनगर बर्डिंग पाल्स या ग्रुप च्या सदस्यांनी एकत्र येत रविवारी सकाळी तलावाच्या किनाऱ्यावरील हा कचरा मोठ्याप्रमाणावर गोळा केला. यावेळी



त्यांना बुऱ्हानगर चे सरपंच रावसाहेब कर्डीले यांचे सहकार्य लाभले. या मोहिमेत जिल्हा मानद वन्य जीव रक्षक व महापालिका पर्यवरण दूत मंदार साबळे, पक्षीमित्र अजिंक्य सुपेकर, हितेश ओबेरॉय, ओंकार बेद्रे,सचिन शिरसाठ,सचिन राणे,सचिन कराळे, प्रसाद तोडमल,तुषार लहारे,रामेश्वर चेमटे,सिराज चेमटे, सई चेमटे आदी सहभागी झाले होते.यावेळी सुपेकर यांनी जल प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी नदी नाले तलावाच्या पाण्यात निर्माल्य तसेच मूर्ती विसर्जित करू नये असे या ग्रुप च्या वतीने आवाहन केले आहे तसेच पर्यावरण रक्षण ही आपल्या सर्वांची नैतिक जवाबदारी आहे त्याचे भान सर्वांनी बाळगायला हवे असेही ते म्हणाले.

साबळे यांनी पाणी हे जीवन आहे.त्यात प्रदूषण हे पर्यावरणासाठी घातक आहे. कापुरवाडी तलावात हिवाळ्यात मोठया प्रमाणात देश विदेशातून पाणपक्षी येतात. येथे २०० पेक्षा अधिक पक्षी प्रजातींची नोंद या समुहाने केली आहे.हे आपले वैभव आहे आणि ते आपण जपले पाहिजे तसेच या भागात सार्वजनिक शौचालय असतानाही नागरिक तलावाच्या भागात उघड्यावर शौचास जातात यामुळे पावसाचे पाणी तलावात वहात जाताना रोगराईला निमंत्रण मिळते यामुळे आपण प्रत्येकाने स्वच्छता राखणे गरजेचे असल्याचे सांगितले.

यावेळी गोळा केलेला सगळा कचरा घंटागाडी मार्फत कचरा डेपो मध्ये पाठवण्यात आला.

## हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळ महोत्सवास प्रारंभ

# हायजिनची विशेष काळजी, रास्त दरात रूचकर फराळ



**समाचार/नगर-दि.२१**

नगरमध्ये केटरिंग व्यवसायात तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या हेमराज केटरर्सचा दिवाळी फराळ गेल्या १५ वर्षांपासून नगरकरांची दिवाळी गोड करीत आहे. हेमराज केटरर्सने शुध्दता व गुणवत्तेचा संगम असलेला चविष्ट व रूचकर दिवाळी फराळ विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. अनारसे, करंजा, लाडूसह खुसखुशीत चकली, चटकदार शेव व चिवडा, शंकरपाळे, मोहन थाळ, काजू कतली या फराळाच्या पदार्थांना मोठी मागणी आहे.

शुद्ध तुपातील मिठाई सुद्धा येथील वैशिष्ट्य आहे. खजूर बर्फी, हरियाणाची मटरी दिवाळी फराळाचा गोडवा आणखी वाढविणार आहे. हेमराज केटरर्सच्या कोठी रोडवरील मुख्य दालनात फराळ विक्री सुरू झाली आहे. याठिकाणी अतिशय हायजिनिक पध्दतीने फराळ तयार केला जात आहे. ३०० रूपये किलो दराने फराळ उपलब्ध आहे, अशी माहिती हेमराज केटरर्सचे संचालिका शिला बोरा यांनी दिली.

हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळाबाबत माहिती देताना बोरा यांनी सांगितले की, १४ वर्षांपूर्वी घरगुती स्वाद व आपुलकीचा तयार दिवाळी फराळ देण्याचे ठरवले. हेमराज केटरर्सने सुरुवातीपासूनच मालाच्या उत्कृष्ट दर्जाला प्राधान्य दिले आहे. यंदाही ग्राहकांना अतिशय योग्य दरात फराळाचे विविध पदार्थ उपलब्ध करून दिले आहेत. कोलकता, राजस्थान, छत्तीसगड, राजस्थान येथील कारागीर उत्तम चवीचे पदार्थ अतिशय स्वच्छ, हायजेनिक वातावरणात तयार करून दिला जात आहे.

सर्वसामान्यांपासून अनेक दिग्गजांनी गौरवलेल्या हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळाला विविध कारखाने, शैक्षणिक संस्था, कामगार संघटना, शासकीय विभागाकडून मोठी मागणी असते. दिवाळीत शुभेच्छा संदेशासह हेमराज केटरर्सचे आकर्षक पॅकिंग असलेले दिवाळी फराळ बॉक्स दिले जातात. हेमराज बोरा यांची मुले विश्वजीत व प्रसन्न बोरा व सून मयुरी बोरा या व्यवसायात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. दिवाळी फराळातील नमकीन पदार्थांसाठीचे मसाले हेमराज यांच्या पत्नी शिला बोरा स्वत: तयार करतात.

फराळाच्या ऑर्डरसाठी ग्राहकांनी विश्वजीत बोरा (मो. ९९२१५९९२१६, ९८९०२९८८९९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्राहकांनी फराळ खरेदीसाठी येताना कापडी पिशवी सोबत आणावी, असे आवाहनही हेमराज केटरर्सतर्फे करण्यात आले आहे.


गाळा भाड्याने देणे

पाईपलाईन रोडवर D MART शेजारी रोडटच 850 Sq. Ft. गाळा भाड्याने देणे आहे.

* संपर्क *

9822990348



नावात बदल

माझे जुने नाव TALEKAR NANDABAI BHAGWAN असे होते व माझे नवीन नाव SONALE NANDINI BALASAHEB असे आहे. ही दोन्ही नावे माझीच असून, माझे सध्याचे सर्व व्यवहार SONALE NANDINI BALASAHEB याच नावाने होत आहेत.

SONALE NANDINI BALASAHEB



टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - १८ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२४



| | |
|---|---|
| सिंघम (हिंदी) | 11.30 AM |
| THE WILD ROBOT (3D) | 12.00 PM 05.00 PM |
| विकी विद्या का वो वाला व्हिडिओ | 08.30 AM 01.45 PM 10.15 PM |
| फुलवंती | 04.45 PM |
| VETTAIYAN | 08.30AM 10.30 PM |
| DEVARA-1 | 07.15 PM |
| लाईक आणि सबस्क्राईब | 02.15 PM |
| जिगरा | 09.00 AM 02.00 PM 07.00 PM |
| पाणी | 04.55 PM 10.10 PM |
| BINNY & FAMILY | 07.30 PM |
| राजा राणी | 11.15 AM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show

CONNPLEX

AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


**समाचार/नगर-दि.२१**

## स्वामी समर्थ देवस्थान येथे पोखर्णा व कासवा परिवाराकडून अन्नदान

प्रत्येकाच्या आयुष्यात श्रध्दास्थान असणे महत्वाचे असते. श्रध्देमुळे मनात सेवाभाव निर्माण होतो व चांगले कर्म करण्याची प्रेरणा मिळते. स्वामी समर्थांच्या कृपाशिर्वादाने सर्व भक्तांमध्ये सकारात्मकता निर्माण होते. माळकूप येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान हजारो भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहे. या तीर्थस्थळी दर्शनासाठी आल्यावर समाधान व आनंद मिळतो. दर गुरूवारी याठिकाणी आयोजित महाप्रसादाचा भाविक श्रध्देने लाभ घेतात. अशा कार्याला हातभार लावता येणे ही स्वामींचीच कृपा आहे, असे प्रतिपादन संतोष कासवा यांनी केले.



तीर्थक्षेत्र माळकूप येथील स्वामी समर्थ मंदिरात दर गुरुवारी महाप्रसादाचा कार्यक्रम होतो. यावेळी अन्नदान सेवेचे मानकरी पोखर्णा व कासवा परिवार होते. गेंदालाल पोखर्णा, योगेश पोखर्णा, आनंद पोखर्णा, सचिन पोखर्णा, आयुष पोखर्णा, संतोष कासवा, कमलेश कासवा व दोन्ही परिवारातील सदस्यांच्या हस्ते महाआरती करून प्रसाद वाटपाला प्रारंभ करण्यात आला. स्वामी सेवा भक्त मंडळाने प्रसाद वाटपाची सर्व नियोजन व्यवस्था केली. माळकूप येथील स्वामी समर्थ देवस्थान अतिशय निसर्गरम्य वातावरणात आहे. अध्यात्म व भक्तीची अनुभूती याठिकाणी येते. मंदिरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम, अनुष्ठान आयोजित करण्यात येतात.


शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

m डागा
शांतीलाल डागा

दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०



OUR TRIBUTE

24 th DEATH ANNIVERSARY

DATE - 22 nd Oct.2024

YOU ARE A RAY OF LIGHT WHICH WILL NEVER FADE ...



LATE ASHOKBHAU FIRODIA
FOUNDER OF OUR SCHOOL



FROM
PRINCIPAL & ALL STAFF MEMBERS OF
A.E.S. ASHOKBHAU FIRODIA
ENGLISH MEDIUM SCHOOL & JUNIOR COLLEGE
VISHRAMBAUGH , AHMEDNAGAR.


## महावीर भवन येथे दिवाळी फराळ विक्रीला प्रारंभ



**समाचार/नगर-दि.२१**

सर्वसामान्यांची दिवाळी तितकीच गोड व्हावी यासाठी जैन सोशल फेडरेशन संचलित भगवान महावीर भवन येथे सलग ११व्या वर्षी रूचकर व स्वादिष्ट दिवाळी फराळ उपलब्ध झाला आहे. या फराळ विक्रीला मोठा प्रतिसाद मिळत आहे,अशी माहिती मिलापचंद पटवा यांनी दिली. फराळ विक्री शुभारंभ प्रसंगी गिरीष गांधी, निलेश मुथा, अमित भळगट आदी उपस्थित होते.

जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा यांनी सांगितले की, आचार्यश्री आनंदऋषीजी महाराज यांचे आशिर्वाद व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने जैन सोशल फेडरेशन मागील ११ वर्षांपासून अतिशय अल्प दरात तितक्याच गुणवत्तेचा दिवाळी फराळ सर्वसामान्यांना उपलब्ध करून देत आहे. हा आमच्या केवळ फराळ नाही तर प्रसाद आहे. यात प्रेम, जिव्हाळा, आपुलकी ओतप्रोत भरलेली असते. हा फराळरुपी प्रसाद खर्याह अर्थाने मन प्रफुल्लित करून सर्वांना दिवाळीचा पुरेपुर आनंद देतो. येथून फराळ घेताना प्रत्येकाच्याच डोळ्यात दिसणारी चमक व त्याच्या चेहर्यावरील आनंद आमच्यासाठी लाखमोलाचा आहे.

मिलापचंद पटवा यांनी सांगितले की, गेल्या ११ वर्षांपासून दिवाळीनिमित्त सर्वसामान्यांना अल्पदरात फराळ उपलब्ध करून देताना विशेष आनंद होत असतो. अनेक कारणांनी कच्च्या मालाचे दर खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. असे असले तरी याठिकाणी ना नफा ना तोटा तत्त्वावर फक्त १५० रुपये किलो दराने बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी उपलब्ध करून दिले आहेत. चांगल्या प्रतीचा किराण्याचा वापर करून हायजेनिक वातावरणात सर्व फराळ तयार केला जातो. यासाठी मोठी टिम काम करत असते. ११ वर्षांपूर्वी सुरू केलेला हा उपक्रम सर्वांच्या प्रतिसादामुळे यशस्वी झाला आहे. रुपेश पटवा, अमित पटवा फराळ तयार करण्याची नियोजन व्यवस्था पाहत आहेत.


२१ वर्षाची पर्यटन परंपरा

KESARI

चैतन्य पब्लिसिटी
ट्रॅव्हल्स् व इन्शुरन्स

संचालक - पत्रकार किशोर मरकड

- ऑनलाईन एअर व रेल्वे तिकिट
- देश-विदेशातील हॉटेल बुकींग
- पासपोर्ट व व्हिसा मार्ग/धार्मिक टूर बुकींग
- सर्व न्यूज पेपर व चॅनल ॲडर्व्हटायझिंग
- देश-विदेशातील टुर्स बुकींग.
- केसरी टूर्सचे बुकींग
- स्वतंत्र सहलींचे आयोजन.

रेनबो हाऊस, सावेडी रोड,अ.नगर.
9422222431, 7350553131



UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine

UNITED
PHARMA
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon

90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49


## विक्रांत गणेश मंडळ (ट्रस्ट) आयोजित ‘भव्य बक्षीस योजने’चे बक्षीस वितरण

**समाचार/नगर-दि.२१**

विक्रांत गणेश मंडळातर्फे गणेशोत्सव -२०२४ निमित्त देणगीदारांसाठी भव्य बक्षीस योजना या उपक्रमाचे पहिल्यांदाच आयोजन केले होते.

गणेश चतुर्थी दि.०७ सप्टेंबर रोजी या योजनेची सुरुवात होऊन दि.२० ऑक्टोबर पर्यंत हि योजना राबविण्यात आली.

देणगीदारांसाठी असलेल्या भव्य बक्षीस योजनेचा सोडत कार्यक्रम काल दि.२० विक्रांत चौक येथे अतिशय उत्साहात पार पडला. यामध्ये पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाच्या मानकरी शिवाजी नगर, कल्याण रोड, येथील पूनम उमेश दळवी या ठरल्या. त्यांना ई-बाईक हे बक्षीस मिळाले. दुसऱ्या क्रमांकाचे MI टी.व्ही. बक्षीस केडगाव येथील सुलताना बिलाल शेख यांना मिळाले.



तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस MI मोबाईल राहुल पाठक यांना मिळाले. चौथे बक्षीस सोन्याची नथ केडगाव येथील श्री बी.डी. पाटील यांना मिळाली. पाचव्या क्रमांकाचे बक्षीस पैठणी दातरंगे मळा येथील समर्थ ससे यांना मिळाली.

या कार्यक्रमाला आकाश प्रिसिजन कंपनीचे जनरल मॅनेजर गुलाब राठोड, रिजनल मॅनेजर ज्ञानेश्वर गोरे, आणि संभवनाथ टेलिकॉमचे संचालक अभिजीत शहा हे उपस्थित होते.

या योजनेसाठी आकाश प्रिसिजनचे मॅनेजींग डायरेक्टर श्रीकृष्ण जोशी, आणि संभवनाथ टेलिकॉमचे संचालक अभिजीत शहा यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत आंबेकर यांनी केली. अबोली कुलकर्णी यांच्या बहारदार गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढली. यावेळी देणगीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या योजनेसाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.


Milk & Cream
Icecream Product

HATSUN Daily

Arun® ICECREAMS



प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144